# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत एकनाथ शिंदेंनी दिला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २६ मुंबई**



महाराष्ट्र विधानसभेची मुदत आज संपत असल्याने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे दिला आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हेदेखील राजभवनात उपस्थित होते. अद्याप राज्यात नवीन सरकार स्थापन झालं नसल्याने राज्यपालांकडून एकनाथ शिंदे यांच्यावरच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. मात्र अद्याप मुख्यमंत्रिपदाच्या नावावर शिक्कामोर्तब न झाल्याने नवीन सरकारचा शपथविधी रखडला आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर महायुतीकडून राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला जाऊ शकतो. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत राज्यपालांकडून एकनाथ शिंदे यांनाच काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**काय आहेत शक्यता?**

पुढील वर्षाच्या सुरुवातीला मुंबईसह सर्व महापालिका आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होतील, तोवर शिंदे यांना मुख्यमंत्रिपदी ठेवले जाईल आणि पुढची चार वर्षे फडणवीस मुख्यमंत्री राहतील, असा तर्कही फिरत आहे. मात्र, फडणवीस यांना आताच मुख्यमंत्री केले तरी महायुतीची स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील कामगिरी उत्तमच असेल, उपमुख्यमंत्री म्हणूनही शिंदे या यशासाठी योगदान देऊ शकतात, असे भाजपमधील काही नेत्यांचे म्हणणे आहे. आधी फडणवीस यांना दोन वर्षे, नंतर शिंदे यांना दोन वर्षे आणि मग शेवटी अजित पवार यांना एक वर्ष मुख्यमंत्रिपद दिले जाईल, असेही बोलले जात आहे. सोबतच फडणवीस, शिंदे यांना अडीच अडीच वर्षे हे पद दिले जाईल, असा दावाही काही जण करत आहेत. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यास शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद वा महत्त्वाचे केंद्रीय मंत्रिपद दिले जाऊ शकते. अशावेळी खा. श्रीकांत शिंदे हे राज्य मंत्रिमंडळात राहतील, असा तर्कही दिला जात आहे.

## महाविकास आघाडीत बिघाडी होणार?

### शिवसेना ठाकरे गटासोबत फारकत घ्या; काँग्रेसचा पक्षांतर्गत सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**



विधानसभा निवडणूक पार पडली. महायुतीला मोठ यश आलं तर दुसऱ्या बाजुला महाविकास आघाडी नेस्तनाबूत झाली. शंभर शंबरच्या आसपास जागा लढवलेली महाविकास आघाडी ५० मध्ये गारद झाली इतकी वाताहत यामध्ये झाली आहे. त्यानंतर आता महाविकास आघाडी किती दिवस भक्कम असेल याबद्दल उलट-सुलट चर्चा सुरू आहे. दरम्यान, शिवसेना उबाठासोबत फारकत घ्यावी असा सुर काँग्रेसमधील काही वर्गाचा आहे असं सध्या समोर आलं आहे.

लोकसभा निवडणूक काळात शिवसेने ठाकरे गटाच्या नेत्यांनी घेतलेल्या ताठर भूमिकेवर काँग्रेसच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. सांगलीच्या जागेवरून या दोन्ही पक्षातील अंतर्गत वाद विकोपाला गेला होता. सांगली मतदारसंघाती काँग्रेसची ताकद अधिक असल्याने ही जागा आपल्याला मिळावी यासाठी प्रयत्न झाले. मात्र, उद्धव ठाकरे यांनी त्या जागेबाबत काहीही भूमिक घेतली नाही. अखेर काँग्रेसचे विशाल पाटील अपक्ष लढले आणि विजयीसुद्धा झाले. त्यामुळे अशा हेकेखोर शिवसेनेच्या नेत्यांमुळे आपलं नुकसान होतंय अशी भावना काही काँग्रेसच्या नेत्यांची आहे असंही एक सूर आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीची अशी अवस्था होण्यामागे वेगवेगळी कारणं असली, तरी प्रमुख कारण आहे, नकारात्मक प्रचार. महायुती सरकारने महिलांसाठी लाडकी बहिण योजना, ज्येष्ठांसाठी, युवकांसाठी स्टायपेड अशा वेगवेगळ्या योजना आणल्या.

## साहेब..विधानसभेत ईव्हीएम ने केला घात?

### शरद पवारांच्या पक्षाच्या बैठकीत सूर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**



विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज आपल्या पक्षाचे नवनिर्वाचित आमदार आणि पराभूत उमेदवारांची बैठक बोलावली होती. मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान इथं आयोजित बैठकीत बहुतांश उमेदवारांनी शरद पवारांसमोर ईव्हीएमबाबत रोष व्यक्त केला आहे. ईव्हीएममध्ये मोठ्या प्रमाणात गडबडी झाल्यानेच पक्षाला अपयशाचा सामना करावा लागल्याची भूमिका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पराभूत उमेदवारांसह आमदारांनीही मांडली आहे.

विविध नेत्यांनी ईव्हीएमबाबतचे आक्षेप नोंदवल्यानंतर शरद पवार यांनी याबाबत आपण कायदेशीर लढाई लढणार असल्याचं बैठकीत सांगितल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएमबाबत आलेल्या तक्रारींवर न्यायालयात दाद मागण्याचा निर्णय शरद पवारांच्या पक्षाकडून घेण्यात आला आहे. यासाठी वकिलांची टीमही नेमली जाणार असल्याचे समजते.

## जिल्ह्यातील सर्वच मतदारसंघात 'एक है तो सेफ है'चा नारा ठरला यशस्वी

### विधानसभा निवडणुकीचा रणसंग्राम : विरोधक झाले पार गारद, अनेक उमेदवारांचे डिपॉझिट झाले जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**







महाराष्ट्र विधानसभा निवडणूक प्रचाराच्या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'एक है तो सेफ है'चा नारा दिला. हा नारा अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात पोहोचला आणि याचा मोठा परिणाम निवडणूक निकालात दिसून आला. हाच नारा शहरासह ग्रामीण भागात घराघरात पोहोचवला. याची फलश्रुती जिल्ह्यातील पाच ही मतदारसंघांत भाजपच्या शानदार विजयाने झाली.

मेळघाट विधानसभा मतदारसंघात भाजपचे केवलराम काळे यांच्या प्रभावी प्रचार यंत्रणेपुढे विरोधक असलेले काँग्रेसचे चिमोटे, व प्रहारचे उमेदवार राजकुमार पटेल गारद झाले. तर अचलपूर मतदारसंघात भाजपचा नवा चेहरा असलेले प्रवीण तायडे यांच्यापुढे काँग्रेसचे दिग्गज नेते बबलू देशमुख व प्रहारचे बच्चू कडू यांचा पराभव झाला.या मतदार संघाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते हे विशेष.

तसेच तिवसा मतदारसंघात भाजपचे राजेश वानखडे यांनी पुन्हा एकदा कमळ फुलविले असून त्यांनी काँग्रेसच्या दिग्गज नेत्या यशोमती ठाकूर यांचा पराभव केला असून, मोर्शी - वरुड मतदार संघात भाजपाचे उमेश यावलकर हे विजयी झालेत.धामणगाव रेल्वे मतदार संघात शांत व सर्वांना सोबत घेऊन चालणारे अशी ज्यांची सम्पूर्ण मतदार संघात ओळख आहे असे प्रताप दादा अडसड यांनी काँग्रेस चे विरेंद्र जगताप यांचा पराभव केला विशेष म्हणजे याच मतदार संघात राहुल गांधी यांची विशाल जाहीर सभा सुद्धा झाली होती हे विशेष.


**जिल्ह्यात हिंदुत्वाचा गजर**

भाजपकडून जिल्ह्यात हिंदुत्वाचा गजर दिला जात होता. अयोध्येतील श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापनेवेळी राम मंदिराची प्रतिकृती साकारत भव्य- दिव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या सर्वांचे भाजपा महायुतीला यश मिळाल्याचे निकालात दिसून आले. हिंदुत्ववादी मतांचे विभाजन टाळण्यासाठी भाजपातील नाराजांनादेखील जवळ करत विजयाच्या दिशेने पावले टाकली. लाडकी बहीण योजनेचा परिणाम निवडणुकीतप्रभावी ठरला आणि याचा थेट परिणाम जिल्ह्यातील चारही उमेदवारांच्या विजयात दिसून आला. तिरंगी लढत प्रत्यक्षात दुरंगी ठरली. पारंपरिक मतांसोबतच शहरातील दलित आणि मुस्लीम मते मिळून विजय मिळेल, असा कयास विरोधक उमेदवारांच्या समर्थकांकडून लावला जात होता. मात्र, प्रत्यक्षात याचा परिणाम कुठेच दिसून आला नाही, हे विशेष.

## हरयाणा, महाराष्ट्रानंतर आता भाजपाची दिल्लीवर नजर

### केजरीवालांना नमवण्यासाठी आखली अशी रणनीती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ नवी दिल्ली**



मागच्या दोन महिन्यांच्या काळात भाजपाने हरयाणा आणि महाराष्ट्र ही देशातील प्रमुख अशी दोन राज्यं जिंकून लोकसभा निवडणुकीत झालेल्या पिछेहाटीची काही प्रमाणात भरपाई केली आहे. आता या दोन राज्यांत सत्ता मिळवल्यानंतर भाजपाने मागच्या दहा वर्षांपासून अरविंद केजरीवाल यांच्या ताब्यात असलेल्या दिल्लीवर कब्जा करण्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. २०१३, २०१५ आणि २०२० अशा तीन विधानसभा निवडणुकांत दिल्लीमध्ये विजय मिळवण्यात अपयश आल्यानंतर आता भाजपाने आता केजरीवाल यांना नमवण्यासाठी नव्या ने रणनीती आखली आहे. तसेच २०१३ आणि २०२० मध्ये केलेल्या चुका टाळणार असल्याचे भाजपाच्या नेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

भाजपा दिल्ली विधानसभा निवडणूक ही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा घोषित न करता लढण्याची शक्यता आहे. दिल्लीतील भाजपाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्याने सांगितले की, पक्षाच्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या संकेतांनुसार भाजपाचं वरिष्ठ नेतृत्वाचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली प्रचाराची यशस्वी रणनीती कायम ठेवण्यावर विश्वास आहे. त्याचा सकारात्मक परिणाम विविध राज्यांमधील निवडणुकीत दिसून आला आहे.

## एकनाथ शिंदेंच्या आजी-माजी खासदारांनी मोदींकडे मागितली भेटीची वेळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नवी दिल्ली**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं असलं तरी मुख्यमंत्रिपदाबाबतचा तिढा अद्याप कायम आहे. त्यातच राज्यात आता भाजपचाच मुख्यमंत्री होईल, अशी भूमिका भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने मांडल्याने विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गोटात अस्वस्थता असल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या आजी-माजी खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे भेटीसाठी वेळ मागितल्याची माहिती आहे.

शिवसेनेचे आजी-माजी खासदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. या भेटीत ते मोदींकडे महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनाच संधी द्यावी, अशी विनंती करू शकतात. त्यामुळे मुख्यमंत्रिपदाबाबत आपलं नाव मागे पडताच एकनाथ शिंदे यांच्याकडून थेट दिल्लीत दबावतंत्राचा अवलंब केला जात आहे का, अशाही चर्चांना आता उधाण आलं आहे.

दरम्यान, शिवसेना आणि भाजपमध्ये मुख्यमंत्रिपदावरून रस्सीखेच सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार मंगळवारी दिल्लीला येणार असून शाह यांची भेट घेणार असल्याचंही बोललं जात आहे. त्यामुळे राज्याच्या मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर नक्की कोण विराजमान होणार, याबाबतची उत्सुकता आणखीनच वाढली आहे.

## निवडणुकीत बॅलेट पेपर वापरा, सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नवी दिल्ली**



संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आहे. या निवडणुकीत महायुती प्रचंड बहुमतासह दुसऱ्यांदा सरकार स्थापन करणार आहे. या निवडणुकीत २८८ पैकी २३६ जागांवर महायुतीने विजय मिळवला आहे तर महाविकास आघाडीला फक्त ४६ जागांवर यश मिळाला आहे. त्यामुळे विरोधकांकडून पुन्हा एकदा ईव्हीएम मशीनचा मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे. ईव्हीएम मशीनमध्ये घोळ असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाने देशातील निवडणुकीत बॅलेट पेपरद्वारे मतदान घेण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली आहे. त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाला मोठा दिलासा मिळाला आहे.


या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि पीबी वराळे यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, जेव्हा तुम्ही निवडणूक जिंकता तेव्हा ईव्हीएम मशीनमध्ये छेडछाड केली जात नाही आणि निवडणुका हरल्यावर ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाते. असं या खंडपीठाने म्हटले आहे.

आपण १५० हून अधिक देशांमध्ये गेलो आहे असं याचिकाकर्ते केए पॉल म्हणाले. तेव्हा खंडपीठाने त्यांना विचारले की मतदान बॅलेट पेपरद्वारे केले जाते की प्रत्येक देशात इलेक्ट्रॉनिक मतदानाचा वापर केला जातो. याचिकाकर्त्याने म्हटले आहे की, परदेशात बॅलेट पेपर मतदानाचा मार्ग स्वीकारला आहे आणि भारतानेही तेच केले पाहिजे.

खंडपीठाने विचारले की, तुम्हाला इतर जगापासून वेगळे का व्हायचे नाही? पॉल म्हणाले, देशात भ्रष्टाचार आहे आणि या वर्षी (२०२४) जूनमध्ये निवडणूक आयोगाने ९,००० कोटी रुपये जप्त केल्याचे जाहीर केले. त्यावर खंडपीठाने विचारले की, जर तुम्ही बॅलेट पेपरवर परत गेलात तर भ्रष्टाचार होणार नाही का? पॉल यांनी दावा केला की टेस्लाचे सीईओ आणि सह-संस्थापक एलोन मस्क म्हणाले की ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते तसेच त्यांनी यावेळी टीडीपीचे प्रमुख एन चंद्राबाबू नायडू आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनीही दावा केला होता की ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते. असं याचिकाकर्ते केए पॉल म्हणाले.

## नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात 'नवा गडी नवा राज'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६नागपूर**



विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत यश मिळाल्याने सध्या चर्चा नवा मुख्यमंत्री कोण असणार? याबाबतत होत आहे. येत्या काही दिवसात नवा मुख्यमंत्री ठरल्यानंतर लगेचच म्हणजे डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात नागपुरात हिवाळी अधिवेशन होणार असून त्याला नवे मुख्यमंत्री सामोरे जाणार आहेत. त्यामुळे त्याचे स्वरूप 'नवा गडी नवा राज' राहण्याची शक्यता आहे.

सध्याच्या सरकारचे नेतृत्व एकनाथ शिंदे यांच्याकडे होते व नागपूरकर देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री होते. आता नागपूर अधिवेशनाला मुख्यमंत्री म्हणून पुन्हा शिंदेच नागपुरात येतात की, देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात ही माळ पडते याकडे नागपूरकर नागरिकांसह अधिवेशनाची तयारी करणाऱ्या प्रशासनाचेही लक्ष लागले आहे. यापूर्वी २०१४ ते २०१९ या पाच वर्षात मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाला तोंड दिले होते. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारचा अपवाद सोडला तर ते उपमुख्यमंत्री म्हणून नागपूर अधिवेशनात उपस्थित राहात होते. हे येथे उल्लेखनीय.

## संपादकीय ......

# अनन्यसाधारण संविधान

घटना समितीमध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, राजेंद्र प्रसाद, महात्मा गांधी यांच्यासारखी अनेक महान आणि अभ्यासू मंडळी होती. पाऊणशे वर्षांचा काळ पुढे आल्यानंतर मागे वळून पाहिले तर असे लक्षात येईल की, राज्यघटनेने परस्परांशी सांगड घालत उभा केलेल्या यंत्रणांमुळेच आज कोणत्याही परिस्थितीत देशाची लोकशाही अबाधित राहू शकते. आज भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्यानिमित्ताने...

केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य सरकार प्रकरणामध्ये १९७३ मध्ये एक मुद्दा उपस्थित झाला होता, तो म्हणजे राज्यघटनेची सुरुवात कलम १ पासून होते; मग घटनेचा उपद्धात वाचायचा की नाही, विचारात घ्यायचा की नाही, त्याची गरज आहे की नाही? तेव्हा असे ठरवले गेले की, उपद्धात हा भारतीय राज्यघटनेचा स्रोतही आहे आणि त्याकडूनच आपल्याला अधिकारही मिळालेले आहेत. त्यामुळे संसदेला अथवा कायदे मंडळांना सार्वभौमत्व नसून, सार्वभौमत्व हे लोकांकडेच आहे. तसेच आपला उपद्धात हा घटनेचाच भाग आहे, किंबहुना ती घटनेची मूलभूत चौकट आहे. या चौकटीला धक्का लागेल असा कोणताही निर्णय कायदे मंडळांना घेता येणार नाही. इतकेच नव्हे, तर यातील कोणतेही शब्द काढून टाकायचे झाल्यास त्याबाबतचा अंतिम निर्णय हा सर्वोच्च न्यायालयाचा असेल, संसदेचा नसेल, असे सांगितले गेले आणि ते स्वाभाविकच होते.

उपद्धातामध्ये नेमके काय म्हटले आहे? तर आम्ही भारतीय सार्वभौम, समतावादी, निधर्मी असलेले भारत राष्ट्र अस्तित्वात आणत आहोत. हे राष्ट्र केवळ राज्य करण्यासाठी नसून, आमची काही उद्दिष्टे आहेत, त्यांची पूर्तता करायची आहे. सर्वसमावेशक न्याय, साम्य-समानता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी ही घटना अमलात आणायची आहे. आम्हाला सर्वांनाच प्रगतीच्या दिशेने जायचे आहे. आमच्यामधील जे मागासलेले आहेत, त्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचा विकास साधायचा आहे. यासाठी आम्हाला स्वतंत्र राष्ट्राची, घटनेची आणि कायद्यांची गरज आहे. आपल्याकडील कायद्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाने केले आणि दुसर्यावर लादले असे नाहीत. ते आपणच तयार केलेले असून, स्वीकारलेले असून, आपण त्यांना बांधिल आहोत. उपद्धातामधील या ढाच्यावर, गाभ्यावर राज्यघटना आणि पर्यायाने देशाची लोकशाही चौकट उभी आहे. राज्यघटनेमध्ये 'बॅलन्स ऑफ पॉवर' आणि 'डिव्हिजन ऑफ पॉवर' असे दोन मुख्य प्रकार आहेत. त्यानुसार, कायदा तयार करणे, कायद्यांची अंमलबजावणी करणे आणि अंमलबजावणीत तयार झालेले वाद किंवा दोष सोडवणे, ही सरकारची तीन प्रमुख अंगे आहेत. या तिन्हीसाठी स्वतंत्र यंत्रणा असणे आवश्यक असते. या तीन महत्त्वाच्या अंगांना आपण कायदे मंडळ, न्यायसंस्था आणि कार्यकारी व्यवस्था असे म्हणतो. या तीनही व्यवस्थांमध्ये समतोल राहण्यासाठीच्या स्पष्ट तरतुदी तसेच भविष्यात काही वादाचे, अधिक्षेपाचे मुद्दे निर्माण झाल्यास त्यासंदर्भातील तरतुदीही घटनाकारांनी राज्यघटनेमध्ये त्यावेळीच समाविष्ट केलेल्या आहेत. हे देशाचे आणि राज्यघटनेचे सर्वात मोठे बलस्थान आहे. याखेरीज संविधानाची अशी अनेक बलस्थाने आहेत, ज्यांमुळे आज देशातील लोकशाहीचा गाडा पुढे जात आहे.

अमेरिकेमधील संघराज्य व्यवस्थेमध्ये प्रत्येक राज्याला स्वतःची घटना आहे. आपल्याकडील राज्यांना अशा प्रकारे वेगळी राज्यघटना नाही. त्यांचे अस्तित्वही वेगळे नाही. त्यामुळेच राज्यांचा विस्तार किंवा विभागणी यासाठीचे अधिकार हे संसदेला आहेत. संघराज्य पद्धतीमध्ये संसदेला सर्वोच्च स्थान असले, तरी संसद मनमानीपणाने, स्वैराचाराने किंवा लोकांच्या मूलभूत हक्कांना बाधा आणणारे कायदे करू नये यासाठी राज्यघटनेच्या १२ ते ३६ या विभागांमध्ये मूलभूत हक्कांचा (फंडामेंटल राईटस्) समावेश करण्यात आला. मूलभूत हक्कांचा खरा अर्थ काय? तर मूलभूत हक्क लोकांनी स्वतःसाठी निर्माण केलेले आहेत, ते संसदेने दिलेले नाहीत. त्यामुळेच मूलभूत हक्क हे संसदेवर बंधनकारक आहेत. या बंधनाला पात्र राहूनच संसदेने कायदे करणे आवश्यक आहे. राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला मूलभूत हक्क आहे. हे मूलभूत हक्क हीच खरी आपली ताकद आहे. लोकनियुक्त सरकारांना कितीही पाशवी बहुमत मिळाले, तरी ते नागरिकांचे मूलभूत हक्क काढून घेऊ शकत नाहीत, ही भारतीय लोकशाहीला संविधानाने दिलेली सर्वात मोठी शक्ती आहे. भारतीय संविधानामध्ये आजवर १०६ दुरुस्त्या झाल्या; पण नागरिकांचे मूलभूत हक्क आजही अबाधित आहेत. भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, जातीय, धार्मिक विषमता-विविधता असतानाही गेल्या ७५ वर्षांत भारत अखंडपणाने, एकात्मतेने प्रगतीच्या दिशेने जात आहे याचे मूळ संविधान आणि संविधानाने आखून दिलेली चौकट हे आहे, ही बाब कदापि विसरता येणार नाही. पाकिस्तान, नेपाळ, म्यानमार, बांगला देश यांसारख्या भारताच्या शेजारी राष्ट्रांमध्ये लोकशाही राज्यव्यवस्थेची स्थिती पाहताना भारतीय लोकशाही उज्ज्वल दिसण्यामागे संविधानाचा वाटा बहुमूल्य आहे, हे प्रत्येक भारतीयाने लक्षात घ्यायला हवे. हाच संविधान

# कीड व रोगांच्या नियंत्रणासाठी निंबोळी पेंडीवर मेटॅऱ्हाझीयम व ट्रायकोडर्मा बुरशी कशी वाढवावी




**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक** - कीडनाशकांच्या वापरामुळे किटकांचा संहार प्रत्यक्ष दिसत असल्यामुळे पीक संरक्षणात मोठ्या प्रमाणात त्यांचा वापर केला जात आहे. त्याचे दूरगामी परिणाम माती आणि पर्यावरणावर होत आहेत.

कीडनाशकांच्या अनियंत्रित वापरामुळे बरेच विपरीत परिणाम होत असतात. त्यामुळे त्यांचे दुष्परिणाम दृष्टीआड करून चालणार नाही. सध्या जैविक पद्धतीने कीडनियंत्रण करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.यासाठी शेतकरी कीडीच्या व रोगांच्या नियंत्रणासाठी मेटॅऱ्हाझीयम व ट्रायकोडर्मा ह्या परोपजीवी बुरशींचा वापर करू शकतात. ह्या बुरशी निंबोळी पेंडीवर कशा वाढवायच्या या विषयी माहिती पाहूया.

**निंबोळी पेंडीवर बुरशी वाढवणे**

१) जमिनीतील वेगवेगळ्या-किडीच्या नियंत्रणासाठी मेटॅऱ्हाझीयम ही परोपजीवी बुरशी, तसेच मर रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा परोपजीवी बुरशीची निंबोळी पेंड व शेणखतात मिश्रण करून त्यांची वाढ करून नंतर जमिनीत टाकल्यास अर्ध्या मात्रेमध्ये काम होते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

२) त्यासाठी १०० कि. ग्रॅ. निंबोळी पेंड +४ कि.ग्रॅ. बुरशी ओलसर करून ५ दिवस ओलसर पोते किंवा प्लॅस्टीक कागदाने झाकूण ठेवावी. ३) निंबोळी पेंडीवर वाढलेली बुरशी पुन्हा शेणखातवर वाढविण्यासाठी १ टन चांगले कुजलेले शेणखत+निंबोळीयुक्त बुरशी (वरील परोपजीवी बुरशीयुक्त निंबोळी पेंड) चांगले मिसळावे व ओलसर करून ४-५ दिवस झाकुन ठेवावे व नंतर जमिनीत मिसळावे.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन (पुरुष व महिला) स्पर्धेकरीता विद्यापीठाची चमू घोषित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती**कलिंगा इन्स्टिटएट ऑफ इन्डस्ट्रियल टेक्नॉलॉजी, भुवनेश्वर (ओरिसा) येथे २४ ते २८ डिसेंबर, २०२४ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन (पुरुष व महिला) स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संघाची चमू घोषित करण्यात आली आहे.

**पुरुष संघ**चमूमध्ये श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीचा यश राठी, नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतचा नितीन राठोड व विश्वजित इंगोले, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीचा सुरज वैद्य व बिट्टू कुमार साव, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा करण भालेराव, दर्शन जाधव, सर्वेश डांगे व राज काकडे

**महिला संघ**- महिला संघामध्ये नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंतची कु. प्रतिक्षा तुपट, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीची कु. आस्था जोंधळेकर, विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीची कु. समीक्षा कडू, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीची कु. चेतना देशमुख व आयुषी पांडे, श्रीमती आर.डी.जी. महिला महाविद्यालय, अकोलाची कु. अनिता चव्हाण व कु. प्रेरणा डोंगरे, जे.डी. पाटील महाविद्यालय, दर्यापूरची कु. श्रावणी चव्हाण आणि प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड मॅनेजमेंटची कु. कोमल सुलताने यांचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले

# प्रतिशोध एका वाघिणीचा...




गेल्या महिन्याभरापासून सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकीचा सस्पेन्स काल खऱ्या अर्थाने निकालाच्या दिवशी येऊन संपला. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यामधील २८८ जागांसाठी सुरू असलेल्या रणधुमाळीमधील उमेदवारांनी केलेले दावे प्रतिदावे, शह काटशहाचे राजकारण,एक्झिट पोलचे अंदाज जागच्या जागेवर राहिले. सर्वाधिक दोनशे पार जागा जिंकून भाजप प्रणित महायुती सत्तेत बसली. एवढे मोठे यश या निवडणुकीत मिळेल हे स्वप्नातही कोणाला वाटले नसेल. लोकसभेपासून अमरावती जिल्हा महाविकास आघाडी साठी पोषक ठरलेला असताना कालच्या निकालावरून हे स्पष्ट झाले कीं मतदारांनी आपली मतांची टक्केवारी ६५ टक्क्यावर का नेवून ठेवली? ती महायुतीमधील उमेदवारांच्या विजयी पारड्यात टाकून मोकळी झाली.या जिल्ह्यातील अनेक प्रस्थापित उमेदवारांनी या निवडणुकीत जिकरीची लढत दिली पण ते आपली विजयश्री खेचून आणू शकले नाही.ते राजकारणात अनुभवी मातब्बर असतानाही मायबाप मतदारांचा अंडर करंट समजू शकले नाही.ओळखले ते फक्त राणा दांपत्यांनी.हीच खरी महाविकास आघाडीसाठी शोकांतिका ठरली.आपण बिनदिक्कतपणे निवडून येऊ शकतो असे निवडणूकीं आधी ठामपणे सांगणारे दिग्गज उमेदवार या अंडर करंट ला बळी पडले. अपवाद होता फक्त रवी राणांच्या बडनेरा मतदार संघातील. ते कसं तर या वर्षीच्या लोकसभा निवडणुकीतील हाय वोल्टेज ठरलेल्या लढतीत अमरावती च्या नवनीत रवी राणा यांनी आपली निवडणूक प्रतिष्ठेची बनवली होती. दुदैवाने त्यांचा या निवडणुकीत निसटता पराभव झाला .त्यांचा पराभव करण्याकरीता सर्व पक्षातील त्यांचे प्रतिस्पर्धी नेत्यांनी एकत्रित येऊन त्यांची पराकाष्टा पणाला लावली होती. त्यामुळे अमरावती जिल्ह्यातील लोकांनाही कळलं होतं की नवनीत राणांचा पराभव हा पराभव नसून राणा दाम्पत्यांना थांबवण्याच षडयंत्र होतं. त्याचमुळे हा पराभव अमरावती जिल्ह्यातील जनतेला चांगला जिव्हारी लागला होता . तेव्हापासून अमरावती जिल्ह्यातील जनतेने ठरवलं होतं की येणाऱ्या विधानसभेमध्ये प्रस्थापितांना त्यांची जागा दाखवूनच देऊ. मग येथूनच सुरु झाला खऱ्या अर्थाने एका वाघिणीचा प्रतिशोध. लोकसभेत युती धर्म असतानाही मित्र पक्षाने रवी राणा व नवनीत राणांना कोंडीत पकडले होते. मित्र पक्षांकडून युती धर्म पाळल्या गेला नाही.गेल्या पंधरा वर्षापासून रवी राणा यांची अमरावती जिल्ह्यातील राजकारणात असलेली पकड विरोधकांनी केलेल्या खोट्या प्रचाराने सैल होऊ लागली होती. जिल्ह्यात बहुजन समाजाचा एक प्रेरक चेहरा म्हणून रवी राणा यांची ओळख आहे . याचा सर्व अंदाज घेऊन रवी राणा यांनी आपल्या समर्थकांसह गेल्या काही महिन्यात संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला. लोकसभेतील मतदारांची झालेली नाराजी दूर करण्यास त्यांना यश प्राप्त झाले. आंबेडकरी तसेच बहुजन चळवळीतील बुद्धिजीवी लोकांशी सल्लामसलत करून रणनीती आखण्यात आली. विधानसभा निवडणुकांच्या तिकीटा जाहीर होताच बडनेरा मतदारसंघातील निवडणूक रवी राणा यांचे कार्यकर्ते व मतदारांनी हातात घेतली त्यामुळे त्यांना या निवडणुकीत ६८ हजार चे जवळपास मताधिक्य मिळू शकले.हे आकडे सर्वासाठी थक्क करणारे होते. लोकसभा निवडणुकीत आलेला वाईट अनुभव लक्षात घेऊन पुन्हा नव्या जोमाने राणा दांपत्य जिल्ह्यातील लोकांच्या सेवेत समर्पित झाले.कामाला लागले. तळागाळातील लोकांच्या समस्या सोडवू लागले. हे करत असताना दोघांसाठी या जिल्ह्यातीलही लढाई होती अस्मितेची. ही लढाई होती प्रतिशोधाची. समाज माध्यमातून होणाऱ्या पदोपदी अपमानाच्या व वैयक्तिक स्तरावरील प्रतिक्रियांनी रवी राणा व नवनीत राणा यांचे हौसले परास्त करण्याचा बराच प्रयत्न विरोधकांकडून करण्यात आला.पण ते हौसले येणाऱ्या काळात कसे बुलंद झाले हे कोणाला कळलेच नाही.नवनीत राणा यांना लोकसभा निवडणुकीत हरविण्यासाठी गनिमी कावा करून राजकारणातून हद्दपार करण्याचा प्रयत्न करण्यात आला.अमरावती जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेतलेल्या राणा दाम्पत्याना अखेर मतदारांनी भर भरून आशीर्वाद दिला. महाराष्ट्राच्या विकासाची स्वप्ने बघणारे भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मदतकार्यात आपलाही खारीचा वाटा असावा असे नेहमीच राणा दाम्पत्याना वाटत राहले आणि देवेंद्र फडणवीस देखील रवी राणा व नवनीत राणा यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहले हे सर्वश्रुत आहेच. केंद्रातील मोदी सरकार हे राज्याच्या विकासासाठी नेहमीच कटीबद्ध राहले. राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी तो पायाभूत असो कीं सामाजिक विकास हा घडवून आणण्याची संवैधानिक जबाबदारी आता ही माननिय देवेंद्र फडणवीस यांची आहे. संविधानाचे संरक्षण,महिलांची सुरक्षितता, त्यांना स्वयं निर्भर बनवणे, बेरोजगारांच्या हाताला काम, शेतकऱ्यांसाठीचे हमीभाव, वृद्धाना सामाजिक व कौटुंबिक संरक्षण, आर्थिक व सुदृढ समाज निर्माण ह्या बाबी ची अंमलबजावणी करण्यासाठी मतदारांनी महायुतीला पूर्ण बहुमताने सत्तेवर आणले आहे. त्याचा एक घटक म्हणून अमरावती मधील जनता रवी राणा यांचेकडे मोठ्या आशेने बघत आहे त्यांच्या आशा पूर्ण करण्याकरिता रवी राणा व नवनीत राणा यांना जनतेने भरभरून आशीर्वाद दिलेला आहे.काल निवडणूक निकाल जाहीर होताच रवी राणा यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना माझा विजय हा निळ्या व भगव्या वादळाला समर्पित असल्याचे स्पष्ट केले. सत्तेत असल्याशिवाय विकासाचे ध्येय गाठता येत नाही हे राणा दाम्पत्यांना माहीत आहे त्यामुळे राणा दाम्पत्यावर अमरावतीच्या जनतेने जो विश्वास टाकला ही गौरवाची बाब आहे. येणाऱ्या काळात अमरावतीला विकासाचे केंद्र बनविण्यासाठी राणा दांपत्यांचा हातभार नक्कीच लागणार आहे एवढे मात्र निश्चित. त्याचबरोबर जिल्ह्यात आठ पैकी सात ठिकाणी युतीचे उमेदवार निवडून आल्याने आणि ज्यांना खरोखर घरी बसवायचं होतं त्यांना त्यांची जागा जनतेच्या माध्यमातून राणा दांपत्याने दाखवून दिली. त्यामुळे निवडणूक प्रवासातील घेतलेल्या प्रणाचा एका वाघीनीने प्रतिशोध घेतला असेच म्हणावे लागेल.



विनोद पी. गुहे.
९६६५८३५१११




# पोटाचा कॅन्सर दूर करण्यासाठी गुणकारी फुलकोबी

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

फुलकोबी अर्थात फ्लॉवर कोणत्याही ऋतूत उपलब्ध होतो आणि असंख्य प्रकारच्या खाद्यपदार्थात सढळ हाताने वापरला जातो. अर्थात फक्त चविष्ट पदार्थ बनवता येतात म्हणून नाही; तर मानवी शरीराला उपयुक्त अशा अनेक गुणधर्मांमुळे फ्लॉवर अर्थात फुलकोबीचं आहारात महत्त्वाचं स्थान आहे. फायबर, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, व्हिटॅमिन बी ६ आणि फोलेट असे अनेक पोषक घटक फ्लॉवरमध्ये असतात. कॅल्शियम, फॉस्फरस, प्रोटिन, कार्बोहाईड्रेटस्, व्हिटॅमिन्स, आयोडिन, पोटॅशियम यांनी फ्लॉवर समृद्ध असतो. दाह-विरोधी गुणधर्मासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याच्या क्षमतेसाठी फ्लॉवर ओळखला जातो. फ्लॉवरमध्ये व्हिटॅमिन के असतं. त्यामुळे फ्लॉवर हा चयापचय, रक्तातील कॅल्शियम पातळीच्या नियंत्रणासाठी तसंच रक्त गोठण्यासाठी उपयुक्त ठरतो. फ्लॉवरमुळे कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहण्यास मदत होते. फ्लॉवरमधलं फायबर आणि ओमेगा ३ अॅसिडमुळे 'बॅड कोलेस्ट्रॉल' कमी होण्यास हातभार लागतो.

फुलकोबी खाल्ल्याने हृदयरोग, मधुमेहाचा धोका कमी होतो. फ्लॉवरमध्ये भरपूर फायबर असतं. त्यामुळे नियमित खाल्ल्यास पचनास फायदा होतो. वजन कमी करायचं असेल आणि सहजपणे शरीर हायड्रेटेड ठेवायचं असेल तर फ्लॉवर खाणं फायद्याचं. आपल्यातल्या अनेकांना ठाऊक असेल की कोलीन हे पोषकतत्त्व मज्जासंस्थेच्या



कार्यामध्ये आणि चयापचय प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतं. फ्लॉवर खाल्ल्याने शरीरास कोलीनचा पुरवठा होतो. फ्लॉवर रक्त शुद्ध करण्यास हातभार लावतो. त्याचबरोबर संसर्गापासून त्वचेचा बचाव करतो आणि सांधेदुखी, हाडांच्या दुखण्यावरही गुणकारी मानला जातो. पोटदुखी कमी करण्यासाठी आणि एकंदरच पचनक्रिया सुधारण्यासाठी तसंच सुरळीत राखण्यासाठी फ्लॉवर उपयुक्त ठरतो. शरीरातील विषद्रव्यं दूर करण्याबरोबरच पोटाचा अल्सर व पोटाचा कॅन्सर यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लॉवर खाण्याचा सल्ला दिला जातो.

# फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये होणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांची वेळापत्रक जाहीर


**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती**फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे,नागपूर, छत्रपती संभाजी नगर,मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक,लातूर व कोकण यांना विभागीय मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२,वी व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र १०,वी लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा पुढील प्रमाणे

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र १२,वी परीक्षा सर्वसाधारण व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा,लेखी व प्रात्यक्षिके परीक्षेचा कालावधी मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २०२५ ते मंगळवार दि. १८ मार्च २०२५ असा राहील.

प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच (एन.एस.क्यु.एफ) अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी शुक्रवार दि. २४ जानेवारी २०२५ सोमवार १० फेब्रुवारी २०२५ असा राहील. माध्यमिक शाळांत प्रमाणपत्र १०,वी परीक्षेचा कालावधी शुक्रवार दि.२१ फेब्रुवारी २०२५ ते सोमवार दि. १७ मार्च २०२५ असा राहील. प्रात्यक्षिक,श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षेचा सोमवार दि. ३ फेब्रुवारी २०२५ ते गुरुवार २० फेब्रुवारी २०२५ असा राहील.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांक/निहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscbord.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.२१ नोव्हेंबर २०२४ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे.



मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

यासंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी, असे राज्य मंडळ पुणेचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# आता मनपा, झेडपी निवडणुकीचे वेध


## मनपाच्या ८७ नगरसेवकांसाठी होणार निवडणूक

## जिप ६६ तर पंस १३२ जागांसाठी निवडणूक

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** – तब्बल तीन वर्षांपासून रखडलेल्या महापालिका, जिल्हा परिषदेच्या निवडणुका विधानसभा निवडणुकीनंतर होण्याचे सुतोवात देण्यात आले होते. शनिवारी विधानसभेचे निकाल घोषितहोताच गुडघ्याला बाशिग बांधुन असलेल्या इच्छुकांना आता , महानगर पालिका, जिल्हा परिषदेसह पंचायत समित्या, नगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुकीचे वेध लागले आहे. मनपाचे ८७ नगरसेवक होते. त्यामध्ये वाढण्याची होण्याची शक्यता आहे. तर जिपमध्ये जिल्ह्यात ५९ वरून ६६ सदस्य संख्यांवर निवडणूक लागण्याचे संकेत आहे. यामध्ये पंचायत समितीचे ११८ सदस्यांवरून १३२ सदस्य वाढविण्यात आले होते.



राज्यात बहुतांश जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थावर प्रशासक आहे. मनपाचा कार्यकाळ ८ मार्च २०२२ रोजी संपला होता. प्रशासकाचा कालावधीला तीन वर्ष लोटत आहे. आदी ओबिसी आरक्षण त्यानंतर सदस्य संख्याचा अडथळा या निवडणुकांना होता. परंतु न्यायालयाकडुन शासनालाच सदस्य संख्येबाबत प्रतिज्ञापत्र द्यावयाचे होते. परंतु शासनाकडून अद्यापही प्रतिज्ञापत्र सादर न केल्याने सदर निवडणुका लांबतच गेल्या. मध्येच लोकसभा आणि आता विधानसभमुळे या या निवडणुकांना ब्रेक लागला. परंतु विधानसभा निवडणुकानंतर मात्रनविन वर्षात या निवडणुका लागण्याचे सुतोवाच देण्यात आले होते. केवळ विधानसभेच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. शनिवारी निकालघोषित होताचमहायुतीचे कार्यकर्ते आता सुसाट झाले आहेत. त्यांना देखील झेडपी सदस्यांचे डोहाळे लागले आहे. त्यामुळे गुडघ्याला बाशिग बांधुन असलेल्या इच्छुकांना या निवडणुकीचे वेध लागले आहे. मागे जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचे आरक्षण निश्चित करीत जागा देखील वाढविण्यात आल्या होत्या. त्यामुळे वाढविण्यात आलेल्या जागांवरच निवडणुकालागण्याचे संकेत मिळाले आहे. जिल्हा परिषद सर्कल५९ वरून ६६ तर पंचायत समिती गण ११८ वरून १३२ करण्यात आले होते. त्यामुळे याच संख्येवर जानेवारीत निवडणुका लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित आमदारांचा सत्कार

## खा. अनिल बोंडे, आ. रवि राणांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती** – भावी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई येथे सागर बंगल्यावर खा. डॉ अनिल बोंडे आणि आ. रवी राणा यांनी भेट घेतली.

यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती जिल्ह्यातील सर्व नवनिर्वाचित आमदार रवी राणा (बडनेरा), आमदार प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), आमदार प्रवीण तायडे (अचलपूर), आमदार राजेश वानखडे (तिवसा), आमदार केवलराम काळे (मेळघाट) आणि आमदार उमेश उपाख्य चंदु यावलकर (मोर्शी) शाल-पुष्पगुच्छ देऊन स्वागत सत्कार केला.

यावेळी अमरावती जिल्हा भाजप अध्यक्ष व राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे,आमदार रवी राणा यांचे अमरावती जिल्हा काँग्रेस मुक्त केल्याबद्दल अभिनंदन केले. डॉ अनिल बोंडे आणि रवी राणा यांनी देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री व्हावेत, अशा शुभेच्छा दिल्यात.









अमरावती जिल्ह्यातील, मेळघाट, अचलपूर, मोर्शी, तिवसा, धामणगाव रेल्वे या पाच मतदार संघात भाजपचे तर अमरावतीत महायुतीमधील राकाँ अजित पवार गट, दर्यापूर शिवसेना शिंदे गट आणि बडनेरामध्ये वायएसपीचे रवी राणा यांना भाजपने पाठिंबा दिला होता. यात महायुतीचे अमरावती, मेळघाट, बडनेरा, तिवसा, अच लपूर, मोर्शी आणि धामणगाव रेल्वे या सात मतदार संघातील उमेदवार विजयी झाले असून काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. त्यामुळे भाजपचे विजयी पाच उमेदवार आणि आ. रवि राणा हे स्वतः मुंबईला पोहोचले आणि सत्कार करण्यात आला.

# दर्यापूर बाजार समिती यार्डवर मिळाला कापसाला ८००० हजार रुपये उच्चांकी दर!

## बहुप्रतिक्षित कापूस लिलाव शुभारंभ संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ दर्यापूर :**कृषी उत्पन्न बाजार समिती यार्डवर कापूस शेतमाल वगळता सर्व शेतमालाचा खुल्या पध्दतीने हर्रास होत असतो त्यामध्ये शेकऱ्यांच्या शेतमालाला अधिक भाव मिळून शेतकरी वर्गाच समाधान बघायला मिळत याच पद्धतीने कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापूस शेतमाल विक्री देखील हर्रास पध्दतीने व्हावी व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अधिका अधिक भाव मिळावा या प्रामाणिक हेतूने बाजार समिती संचालक मंडळाने निर्णय घेतला व आंतराष्ट्रीय सहकार दिनाचे औचित्य साधत याच पद्धतीचा शुभारंभ मा. खासदार बळवंत भाऊ वानखडे व मा. सुधाकर पाटील भारसाकडे यांच्या मार्गदर्शनात तसेच ऍड श्रीरंग पाटील अरबट यांच्या हस्ते आज रोजी झाला. बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे यांनी शेतकरी वर्गाला केलेल्या आव्हाहणाला शेतकऱ्यांनी प्रतिसाद देत आज बाजार समिती यार्डवर आपल्या कापूस गाड्या आणून बाजार समितीला सहकार्य केले. सर्वप्रथम कापूस गाड्या ह्या बाजार समिती यार्डवर आणून त्याची नोंद करून टोकन वाटप करून बाजार समितीच्या वतीने कापूस विक्री करिता आणलेल्या सर्व शेतकरी बंधूंचा शाल व श्रीफळ , रोप देऊन सत्कार करण्यात आला याचबरोबर कापूस खरेदी करणाऱ्या व्यापारी वर्गाचा देखील सत्कार करण्यात आला. कापूस हर्रास झाल्यानंतर बाजार समितीची सौदापट्टी घेऊन गाड्या जिनिंगवर मोजमापाकरिता पाठवण्यात आल्या. यावेळी



कापसाला रुपये ८००० हजार उचाकी भाव मिळाला तर सरासरी ७४५० ते ७५२१ पर्यंत भाव खुल्या बाजारात मिळाला यावेळी शुभारंभाचे उदघाटन ऍड. श्रीरंग पाटील अरबट , कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे , बाजार समितीचे उपसभापती राजू पाटील कराळे , बाजार समितीचे संचालक बाळासाहेब हिंगणिकर , संचालक बाळासाहेब वानखडे , संचालक कांचनमालाताई गावंडे , संचालक साहेबराव भदे , संचालक गजाननराव देवतळे , संचालक राजेंद्र पाटील वढाळ , संचालक भारत आठवले , संचालक अनिल पाटील भारसाकडे , संचालक सुनिल पाटील डिके, ऊळीपशू डॉ. अभय गावंडे , संचालक राजेश शेठ राठी, संचालक प्रभाकर पाटील तराळ , संचालक असिफ भाई खान , बाजार समितीचे सचिव हिम्मतराव मातकर , खरेदी विक्रीचे संचालक बाळासाहेब टोळे , खरेदी विक्रीचे संचालक दिनकरराव गायगोले , सी. सी. आय. केंद्र प्रभारी दत्तात्रय कदम , व्यापारी मनोज खंडेलवाल , पुरुषोत्तम साबळे , व्यापारी अंशुल अग्रवाल , राजू शेठ सोमाणी , पवन भाऊ ठाकरे , विशाल भाऊ टोळे , बंटी साबळे , ऍड . दिलीप अग्रवाल , प्रदीप बाप्पू देशमुख , बबनराव देशमुख , अतुल कान्होलीकर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बाजार समितीचे संचालक अनिल पाटील भारसाकडे यांनी मानले व शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुरुकुंजात २८ नोव्हेंबरला बाल साहित्य संमेलन

## जगद्गुरु तुकोबाराया साहित्य परिषदकडून आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ तिवसा–** श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रममोझरी येथे २८ नोव्हेंबर रोजी मराठा सेवा संघ प्रणित जगदूरु तुकोबारायासाहित्य परिषदयांच्यावतीने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथी पर्वावर एक दिवसीय बाल साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन अखिल भारतीय गुरुदेव सेवामंडळ, वगुरुदेवविद्यामंदिर यांच्या सहकार्याने राष्ट्रसंतांच्या पावनभूमीत सुसंस्कार स्मृती मंदिर सभागृहात संपन्न होणार आहे. बाल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध कादंबरीकार, बाल साहित्यिक डॉ. श्रीकांत पाटील (कोल्हापूर) उद्घाटक म्हणून गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दन बोते, प्रमुख अतिथी इतिहास संशोधक, मराठा सेवा संघाचे




महासचिव चंद्रशेखर शिखरे, मराठासेवासंघाचे उपाध्यक्ष अरविदगावंडे, ज्येष्ठ साहित्यिक शिवाजी चाळक (पुणे) साहित्यसंस्कृती मंडळ मुंबईचे सदस्यविलाससिदगीकर, शिक्षण अधिकारी अमरावती प्रिया देशमुख, प्राचार्य दिलीप काळे हे उपस्थित राहणार आहे. संमेलना दरम्यान साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्तबाल साहित्यिक एकनाथ आव्हाड हे सत्कारमूर्ती उपस्थित असणार आहे. बाल साहित्य संमेलन हे पाच सत्रामध्ये पार पडणार असून प्रथम् उद्घाटन समारंभ, दुतीय सत्र परिसंवाद, तिसऱ्या सत्रामध्ये कथाकथन, चौथ्या सत्रामध्ये कवी संमेलन तर पाचवे सत्र समारोपीय अश्या प्रकारे कार्यक्रम होणार आहे. बाल साहित्य संमेलनात सहभागी व्हावे असे आवाहन राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ, अमरावती विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. गजानन घोंगटे, राज्य महासचिव बालाजी जाधवउजेडकर, संमेलनाचे स्वागत अध्यक्ष गुरुदेवविद्या मंदिरचेप्राचार्य मनोजकडू आदींनी केले आहे.

# बालकांचे बँकखाते आधार सिडिंग करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती,–** महिला व बाल विकास विभागातर्फे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपण योजना राबविण्यात येते. या योजनेच्या लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे लाभ देण्यात येणार आहे. यासाठी लाभार्थ्यांनी बालकांचे बँकखाते आधार सिडिंग करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेचा लाभ प्राप्त होत असलेल्या दहा वर्षाच्या आत असलेल्या बालकांचे पालकांसोबत संयुक्त खाते उघडून सदर खात्याशी बालकाचा आधार क्रमांक सिडिंग करावा. तसेच बालकांचे वय दहा वर्षापेक्षा अधिक असल्यास स्वतंत्र बँक खाते उघडून आधार क्रमांक सिडिंग करावा. बालकाचा आधार क्रमांक बँक खात्याशी सिडिंग नसल्यास सदर योजनेचा लाभ जमा होणार नाही, याची लाभार्थ्यांच्या पालकांनी नोंद घ्यावी. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व




बाल विकास अधिकारी कार्यालय, महिला व बाल विकास भवन, राणी दुर्गावती चौक, गर्ल्स हायस्कुलजवळ, अमरावती येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा महिला बालविकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांनी केले आहे.–

# विरोधी पक्षाला संपविण्याचे हे पूर्णपणे षडयंत्र

## ॲड. यशोमती ठाकुर यांचा आरोप

## शेवटचा श्वास असेपर्यंत स्वातंत्र्य समता, बंधूता या मूलभूत तत्वांसाठी लढेन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२६अमरावती** – विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मतदान केलेल्या सर्व मतदारांचे मनापासून आभार. ही एक कठीण निवडणूक होती. हजारो कोटी रुपयांचा खर्च करून राबवण्यात आलेली प्रचारयंत्रणेसमोर पुरोगामी विचारांवर श्रद्धा असलेले कार्यकर्ते नेटाने लढले. ज्या पद्धतीचे निकाल आलेयत ते निव्वळ अविश्वसनीय आहेत. राज्यात शेतकऱ्यांचे प्रश्न, महागाई, बेरोजगारी, नागरीकरणाचे प्रश्न, वाढता विद्वेष असे अनेक ज्वलंत प्रश्न असताना, त्याबाबत सर्व स्तरातून आवाज बुलंद होत होता. महायुती सरकारने हवाबाजी वर कोट्यवधी रुपये खर्च केले, माध्यमांचा गैरवापर करून फेक जनमत बनवण्याचा प्रयत्न केला. राज्यातील जनतेने या सर्व प्रकारांना लोकसभेच्या निवडणुकीत सडेतोड उत्तर दिलं. राज्यातील दोन महत्वाचे पक्ष फोडून राज्यघटनेला हरताळ फासण्यात आला, लोकशाहीची हत्या करण्यात आली. असं सगळं असताना विधानसभा निवडणुकीत कुठलीही लाट नसताना अशा पद्धतीचा निकाल येणं निव्वळ संशयास्पद आहे.जनतेच्या न्यायालयात असा निकाल लागणार नाही, महाराष्ट्रातील जनतेवर आम्हाला तितका विश्वास आहे. आज जो निकाल आला आहे, त्यावर आम्ही आत्मचितन जरूर करू, पण राज्यातील सर्व यंत्रणा, प्रसारमाध्यमांनीही चितन केले पाहिजे.



आम्ही अधिक जोमाने विरोधी पक्षाची भूमिका पार पाडू, राज्याच्या जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरून काम करू. राज्यामध्ये तोतयांचे राज्य आहे, या विरोधातला आमचा संघर्ष असाच सुरू राहील.

यंत्रणांचा गैरवापर करून जनमताची तोडफोड करण्याच्या गुन्हेगारी स्वरूपाच्या राजकारणाच्या विरोधातली आमची लढाई आहे, या लढाईत अशा प्रकारचे निकाल लावणे हाच सत्तेत बसलेल्यांचा कावा आणि हातखंडा आहे. विरोधी पक्षाला संपविणाऱ्या, लोकशाहीचा खून करणाऱ्या या षडयंत्रकारी प्रवृत्तींच्या विरोधात आमचा संघर्ष आहे. काँग्रेस हा एक विचार आहे, हा विचार इथल्या मातीत आहे, नसानसांत आहे. हा लोकशाहीचा विचार आहे, हा संतांचा विचार आहे. शिव–शाहू–फुले–आंबेडकर–सावित्रीमाईंच्या या महाराष्ट्रात फोफावणारी विषवल्ली समूळ नष्ट करण्यासाठी आम्ही काम करण्यास कटीबद्ध आहोत. मी यशोमती भैय्यासाहेब ठाकूर शेवटचा श्वास असेपर्यंत स्वातंत्र्य समता, बंधूता या मूलभूत तत्वांसाठी लढेन. हा माझा शब्द आहे.

# मुख्यमंत्रीपदाबाबत साशंकता

## एकनाथ शिंदे यांचे मध्यरात्री शिवसैनिकांना भावनिक आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई–** विधानसभा निवडणुकीच्या निकालात महायुतीने स्पष्ट बहुमत प्राप्त केले असले तरी आता मुख्यमंत्रीपदावरून रस्सीखेच सुरू आहे. शिवसेना आणि भाजपा अशा दोन्ही पक्षाचे नेते, कार्यकर्ते मुख्यमंत्री पद आपल्याच पक्षाला मिळावे, यासाठी आग्रही आहेत. शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळावे यासाठी शिवसेनेचे नेते मैदानात उतरले असून प्रसारमाध्यमांसमोर तशा प्रकारच्या प्रतिक्रियाही दिल्या जात आहेत. तसेच काही नेत्यांनी शिवसैनिकांना मुंबईत येण्याचे आवाहन केल्यामुळे असंख्य कार्यकर्ते मुंबईच्या दिशेने रवाना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. यातून परिस्थिती चिघळू नये, यासाठी आता एकनाथ शिंदे यांनी स्वतःहून सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत भावनिक आवाहन केले असून कार्यकर्त्यांची समजूत घातली आहे.

२६ नोव्हेंबर २०१९ रोजी अस्तित्वात आलेल्या १४ व्या विधानसभेची मुदत आज (२६ नोव्हेंबर) संपणार आहे. त्यामुळे आज मुख्यमंत्रीपदाबाबत निर्णय होऊन शपथविधी होणार का? यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. भाजपाने निवडणुकीत सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. त्यामुळे विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच मुख्यमंत्रीपद मिळावे, यासाठी भाजपाकडून दबाव सुरू आहे. तसेच शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) नेते आणि कार्यकर्तेही मुख्यमंत्रीपदासाठी आग्रही आहेत.

ते म्हणाले, महायुतीच्या प्रचंड विजयानंतर राज्यात पुन्हा एकदा आपले सरकार स्थापन होणार आहे. महायुती म्हणून आपण एकत्रित निवडणूक लढवली आणि आजही एकत्रच आहोत. माझ्यावरील प्रेमापोटी काही मंडळींनी सर्वांना एकत्र जमण्याचे, मुंबईत येण्याचे आवाहन केले आहे. तुमच्या या प्रेमासाठी मी अत्यंत मनापासून ऋणी आहे. मात्र अशा पद्धतीने माझ्या समर्थनार्थ कुणीही एकत्र येऊ नये, असे आवाहन मी करतो. पुन्हा एकदा माझी नम्र विनंती की शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी वर्षा निवासस्थान किंवा अन्य कुठेही एकत्र जमू नये. समर्थ आणि समृद्ध महाराष्ट्रासाठी महायुती भक्कम होती आहे आणि यापुढेही भक्कमच राहील.

### एकनाथ शिंदे यांनी काय पोस्ट केली?

शिवसैनिक मोठ्या संख्येने वर्षा निवासस्थानी किंवा मुंबईत येऊ नयेत, यासाठी एकनाथ शिंदे यांनी खबरदारी घेतली आहे. त्यांनी मध्यरात्री एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर करत भावनिक आवाहन केले.

# पशूपालकांनी पशूगणनेस सहकार्य करावे-जिल्हाधिकारी सौरभ कटियार

## राज्यात २१व्या पशूगणनेस सुरवात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती,**

आजपासून राज्यातील पशूगणनेला सुरवात झाली आहे. सांख्यिकी माहितीसाठी ही पशूगणना अचूक होणे आवश्यक आहे. त्यामुळे पशूगणनेसाठी पशूपालक, गौशाळाचालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले. जिल्हास्तरीय प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची सभा आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, जिल्हा पशूसंवर्धन उपआयुक्त डॉ. संजय कावरे, महानगरपालिका उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, परिवहन विभागाचे सिद्धार्थ ठोके यांच्यासह अशासकीय सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी, पशूची सांख्यिकी माहिती व्हावी, यासाठी दर पाच वर्षांनी पशूगणना होते. यासाठी प्रगणकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

यासाठी पशूपालकांनी सहकार्य करावे, तसेच जिल्ह्यात जनावरांचे १०० टक्के रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात आले आहे. तसेच अशासकीय सदस्यांना कामकाजासाठी कार्यालयात जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच बँक खातेही उघडण्यात आले आहे. त्यामुळे समितीचे कामकाज करणे सुलभ होणार आहे.पोलिस विभागातर्फे गेल्या कालावधीत पकडलेल्या जनावरांची माहिती सादर करण्यात आली. यात ५८६ जनावरे जप्त करण्यात आली असून ६५ जणांना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी जप्त केलेली जनावरे नोंदणीकृत असलेल्या गौशाळेत देण्यात यावी. यामुळे त्यांचे पोषण योग्यप्रकारे होण्यास मदत मिळेल. नोंदणी केलेल्या गौशाळांना २० लाख रूपये अनुदान आणि प्रती जनावरामागे प्रतिदिन ५० रूपये अनुदान मिळणार आहे. पोलिसांनी गौवंश वाहतूक केलेली वाहने जप्त करून परिवहन विभागाच्या मदतीने वाहनाचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही करावी. तसेच वन विभानानेही त्यांच्याकडील पकडलेली जनावरे नोंदणीकृत गौशाळेला देण्याची कार्यवाही करावी, असे सांगितले. यावेळी उपस्थितांच्या हस्ते माहिती पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

# राज्यभर हुडहुडी, थंडीचा कडाका जाणवणार

## पुणे, नाशिक, महाबळेश्वरला थंडी वाढली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६पुणे –**

राज्यामध्ये तापमानामध्ये चढ-उतार अनुभवायला मिळत आहे. गेल्या दोन तीन दिवसांमध्ये तापमान १२ वरून १० अंशावर नोंदवले जात आहे. सोमवारी (दि.२५) तर परभणीतील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात ९.६ अंश तापमानाची नोंद झाली. ही या हंगामातील निचांकी आहे. पुण्यातही सोमवारी 'एनडीए' भागात १० अंशावर तापमान होते.

हवामान विभागानुसार पुढील काळामध्ये राज्यात अनके भागातील तापमानात चढ-उतार पाहायला मिळणार आहे. काही ठिकाणी थंडी वाढेल, असा इशारा देण्यात आला. राज्यावर हवेचा दाब निर्माण झाल्याने थंडीत चढ-उतार होत आहे. थंडी वाढेल असाही अंदाज देण्यात आला.



| राज्यातील किमान तापमान | |
|---|---|
| पुणे | १२.१ |
| जळगाव | १२.४ |
| कोल्हापूर | १६.७ |
| महाबळेश्वर | १२.० |
| नाशिक | १२.० |
| सांगली | १५.७ |
| सोलापूर | १५.६ |
| मुंबई | २३.० |
| परभणी | १२.७ |
| नागपूर | १३.० |

# आचारसंहिता संपताच विकास कामांना गती

## टेंडरमध्ये अडकलेली जिपची ४६.५९ लाखांची कामे रिलीज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती** जिल्हा परिषदगेल्या ४०दिवसांपासून राज्यात विधानसभा निवडणुकीमुळे आचारसंहिता लागली होती. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकास कामांना गेल्या दीड महिन्यांपासून ब्रेक लागला होता. मात्र आता आचारसंहिता संपली असून झेडपीत प्रशासकीय मंजुरीनंतर निविदा प्रक्रियेत अडकलेली ४६ कोटी ५९ लाखांची २१९ कामे रिलिज झाली आहे. जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात या कामांच्या निविदा प्रक्रियेला वेग आला आहे. त्यामुळे जिप अंतर्गत



ग्रामीण भागातील विकासकामांना पुन्हा गती मिळणार आहे.

सोमवारी जिल्हा परिषदेत अचानक नागरीकांची रेलचेल पाहावयास मिळाली. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या शंभर टक्के उपस्थितीसह बांधकाम विभागात कंत्राटदारांची देखील भाऊगर्दी जिल्हा परिषदेत दिसून आली. शनिवारी निकाल जाहीर होताच हातातील कामे आटोपून कर्मचाऱ्यांची सुटका झाली. त्यामुळे सोमवारी जिल्हा परिषदेत अधिकारी, कर्मचाऱ्यांची शंभर टक्के उपस्थिती, नागरीकांची रेलचेल आणि कंत्राटदारांची देखील गर्दी दिसून आली. सोबतच राज्यात आचारसंहीता हटल्याने आता नियमित कामांना देखील सुरूवात झाली आहे. त्यामुळे सोमवारी निवडणुकीनंतर पहील्यांदाच प्रशासकीय कामाची व्यस्तता पाहावयास मिळाली.

### ४६.५९ लाखांची कामे सुरु होणार

महत्वपूर्ण विकासकामांमध्येय क तिर्थक्षेत्राची १२ कोटी रूपयांच्या १०२ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली परंतु ही कामेनिविदा प्रक्रियेतच अडकली होती. तसेच ३०५४ शिर्षातील २१ कोटी ४५ लाखांची ८० कामे व ५०५४ शिर्षातील १३ कोटी १४ लाखांची ३७ कामे अशी ४६ कोटी ५९ लाखांच्या २१९ कामांना आचारसंहीतेमुळे ब्रेक बसला होता. २१९ कामांना प्रशासकीय मंजुरातमिळालीपरंतुनिविदा प्रक्रिया मात्र निवडणुकीत अडकल्यामुळे तब्बल ४० दिवसांपासुन ही कामे ठप्प होती.–

# ७४७२ मतदारांनी १६० उमेदवारांना नाकारले

## मेळघाटात सर्वाधिक २,४६२ मतदारांची नोटाला पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदार संघाचा शनिवारी निकाल घोषित झाला. यामध्ये तब्बल ७ हजार ४७२ मतदारांना मात्र १६० पैकी एकही उमेदवार पसंत पडला नाही. त्यामुळे या मतदारांनी नोटाचा पर्याय निवडला आहे. मेळघाटात मतदार संघात सर्वाधिक २,४६२ मतदारांनी नोटाला मतदान केले आहे. आठ विधानसभा मतदार संघात १६० उमेदवार रींगणात होते. २५ लाख ४६ हजार ४५८ मतदारांपैकी १६ लाख ९० हजार ८८० मतदारांनी मतदान केले.




याची टक्केवारी ६६.४० इतकी आहे. याची मतमोजणी शनिवारी विधानसभानिहाय झाली. या निवडणुकीत दिग्गजांना धक्का बसला. तर नवख्यांना संधी मिळाल्याचे दिसून आले. परंतु यामध्ये ७ हजार ४७२ मतदारांनी नोटाला मतदान केल्याचे दिसुन आले आहे. १६० पैकी एकही उमेदवार या मतदारांना आवडला नाही. मेळघाट विधानसभा मतदार संघामध्ये अशा २ हजार ४६२ मतदारांचा समावेश आहे. त्या पाठोपाठ दर्यापुर मतदार संघात १ हजार ३ मतदारांनी नोटाला मतदान केले आहे. जिल्ह्यात १६ लाख ९० हजार ८८० मतदान झाले आहे. यामध्ये काही मते ही अवैध देखील ठरली आहे. आठ मतदार संघाचा विचार केल्यास १४५५ मते अवैध ठरली आहे. यामध्ये सर्वाधिक ४६४ मते मोर्शी मतदार संघात अवैध ठरली आहे.

| विधानसभानिहाय नोटा मते | |
|---|---|
| अचलपूर | २९८ |
| तिवसा, | ६३५ |
| मेळघाट | २४६२ |
| धामणगाव रेल्वे | ७६८ |
| दर्यापुर | १००३ |
| बडनेरा | ६९२ |
| अमरावती | ८५६ |
| मोर्शी | ७५८ |

# बंडखोर, आपसांतील उमेदवारांमुळे मविआला फटका

## जागावाटपाचा घोळही ठरला अडथळा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई–** सोलापूर दक्षिण मतदारसंघावरून तर मविआतील मतभेद टोकाला पोहोचले. येथे काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी काँग्रेसच्या बंडखोर उमेदवाराचा उघडपणे प्रचार केल्याने उद्धवसेनेत नाराजी आहे. या मतदारसंघात काँग्रेसचे बाबा मिस्त्री आणि धर्मराज काडादी हे दोन बंडखोर उमेदवार उभे होते. मिस्त्री यांनी २६,७०६ मते घेतली, तर काडादी यांना १८,७४७ मते पडली. पराभूत झालेले उद्धवसेनेचे उमेदवार अमर पाटील यांना ३९,८०५ मते मिळाली. भाजपच्या सुभाष देशमुखांचा येथे ७७,१२७ मतांनी विजय झाला. दोन बंडखोर आणि उद्धवसेनेच्या उमेदवारांच्या मतांची बेरीज ही देशमुख यांना मिळालेल्या मतांपेक्षा अधिक आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात काँग्रेस आणि उद्धवसेनेचे उमेदवार उभे होते. काँग्रेसचे अब्दुल्ल सत्तार गफुर यांनी ७९,६८२ मते घेतली, तर उद्धवसेनेच्या संगीता पाटील यांना २२,७०६ मते मिळाली. येथे शिंदेसेनेचे बालाजी कल्याणकर ३५०२ मतांनी विजयी झाले. पंढरपूरमध्ये काँग्रेस आणि शरद पवार गटाचे उमेदवार समोरासमोर उभे होते. काँग्रेसचे उमेदवार भारत भालके यांना १ लाख १६ हजार ७३३ मते मिळाली.

# विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची पिछेहाट

## राज्यातील या २३ जिल्ह्यांत फोडता आला नाही भोपळा

**विदर्भ प्रजसत्ताक**

**दि.२६ मुंबई–** नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचे निकाल राज्यातील विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीसाठी कमालीचे धक्कादायक असे ठरले आहेत. या निवडणुकीत महाविकास आघाडीतील सर्व पक्षांना एकत्रिपणे मिळून ५० जागाही जिंकता आलेल्या नाहीत. त्यातच एकेकाळी राज्यावर निर्विवाद सत्ता राखणाऱ्या काँग्रेसची जबरदस्त पीछेहाट झाली असून, काँग्रेसला केवळ १६ जागांवरच समाधान मानावे लागले आहे. त्यातही धक्कादायक बाब म्हणजे राज्यातील तब्बल २३ जिल्ह्यांमध्ये काँग्रेसला भोपळाही फोडता आला नसल्याची माहिती आता आकडेवारीमधून समोर आली आहे.

या विधानसभा काँग्रेसने नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर, अकोला जिल्ह्यातील अकोला पश्चिम, वाशिममधील रिसोड, नागपूर जिल्ह्यातील उमरेड, नागपूर पश्चिम आणि नागपूर उत्तर, भंडारा जिल्ह्यातील साकोली, गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी, यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, मुंबई उपनगरमधील मालाड पश्चिम, मुंबई शहरमधील धारावी आणि मुंबादेवी, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, लातूर जिल्ह्यातील लातूर शहर आणि सांगली जिल्ह्यातील पलूस-कडेगाव अशा मिळून १६ जागा जिंकल्या.



तर धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती, वर्धा, गोंदिया, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या २३ जिल्ह्यांत मिळून काँग्रेसला एकही जागा जिंकता आली नाही.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने महाराष्ट्रात १३ अधिक एक अपक्ष अशा १४ जागा जिंकून मोठी मुसंडी मारली होती. मात्र आता विधानसभा निवडणुकीत उडालेल्या घसरगुंडीमुळे काँग्रेससमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे.

# भाजप २६.७७% मतांसह राज्यात नंबर वन

## मविआत मतांमध्ये कोणता पक्ष ठरला सरस?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई –** विधानसभा निवडणुकीत एकूण मतदानाच्या २६.७७ टक्के मते घेऊन भाजप क्रमांक एकवर आहे. शिंदेसेनेला १२.३८ तर अजित पवार गटाला ९.०१ टक्के मते मिळाली, याचा अर्थ महायुतीला एकूण ४८.१६ टक्के मते मिळाली. महाविकास आघाडीत काँग्रेसला १२.४१, उद्धवसेनेला ९.९६ टक्के, तर शरद पवार गटाला ११.२८ म्हणजे ३३.६५ टक्के मते मिळाली. या निवडणुकीत ६ कोटी ४५ लाख ९२ हजार ५०८ इतके मतदान झाले. त्यात भाजपला १ कोटी ७२ लाख ९३ हजार ६५० मते मिळाली. शिंदेसेनेला ७९ लाख ९६ हजार ९३० मते, अजित पवार गटाला ५८ लाख १६ हजार ५६६ मते आहेत. मतांची टक्केवारी या मिळालेल्या मतांशी तुलना करून काढली आहे. भाजप – भाजपने ज्या १४९ जागा लढविल्या तिथे झालेल्या आणि त्यातून भाजपला मिळालेल्या मतांची टक्केवारी काढली



असता पक्षाच्या उमेदवारांना सरासरी ५१.७८ टक्के मते मिळाली. १३२ उमेदवार निवडून आले. आपल्या उमेदवारांना ५० टक्क्यांहून अधिक मते मिळाली पाहिजेत हे उद्दिष्ट भाजपने साध्य केले. भाजपने ज्या जागा लढविल्या तिथे मतदान झाले ३ कोटी ३३ लाख ९५ हजार ६२१. भाजपच्या उमेदवारांना त्यातील १ कोटी ७२ लाख ९३ हजार ६५० मते मिळाली. याचा अर्थ त्यांना झालेल्या मतदानाच्या ५१.७८ टक्के मते मिळाली.

# १२ मतदारसंघात बसपा, वंचित व मनसेपेक्षा अपक्ष उमेदवार ठरले भारी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६मुंबई–** काँग्रेससाठी किलर ठरणारे नागपूर बसपा, वंचित या पक्षांच्या उमेदवारांवर यंदा जमानत जप्तीची वेळ आली आहे. यंदा निवडणुकीत हे फॅक्टर अपक्षांपेक्षाही कमकुवत ठरले असून, अपक्ष उमेदवारापेक्षा या पक्षांच्या मतांच्या टक्केवारीत प्रचंड घसरण झाली आहे. उलट जिल्ह्यातील काही मतदारसंघांत अपक्ष थेट लढतीत होते.

विधानसभेच्या निवडणुकीत यंदाही बहुजन समाज पक्ष, वंचित बहुजन आघाडी या पक्षांचे उमेदवार काँग्रेसच्या उमेदवाराला विजयापासून रोखू शकतात, अशी शक्यता निवडणुकीपूर्वी व्यक्त केली जात होती.जिल्ह्यातील १२ ही मतदारसंघांत वंचित व बसपाने आपले उमेदवार उभे करून प्रचारही जोरदार केला होता. मात्र, उत्तर नागपूर विधानसभेचा उमेदवाराचा अपवाद वगळता एकाही उमेदवाराला पाचअंकी आकडा गाठता आला नाही. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे निवडणुकीपूर्वी ताकदीने मैदानात उतरल्यामुळे मनसेचे उमेदवार लढतीत रंगत आणेल, अशी अपेक्षा होती. मात्र, पूर्व नागपूर मतदारसंघात मनसेच्या उमेदवाराने सर्वाधिक २२६१ मते घेतली. काही मतदारसंघांत उमेदवार तीन आकड्यांतच गुंडाळले.



केवळ १.०१ टक्के मतदान जिल्ह्यातील १२ ही विधानसभा मतदारसंघांत मनसे, वंचित, बसपा यांच्यासह किरकोळ पक्षांना मिळालेल्या मतांची आकडेवारी १.०१ टक्के असून, अपक्षांना मिळालेल्या मतांची टक्केवारी ८.५ टक्के आहेत. याचाच अर्थ हे राजकीय पक्ष जिल्ह्यात प्रभावहीन ठरले असून, काँग्रेससाठी यंदा यांची कुठलीही डोकेदुःखी दिसून आली नाही.

# राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम ४ डिसेंबर रोजी

## १ ते १९ वर्षांच्या मुलांना जंतनाशकाची गोळी द्या : सचिन कलंत्रे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

शासनाकडुन राष्ट्रीय जंतनाशक दिन मोहीम दिनांक ४ डिसेंबर,२०२४ रोजी महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांच्या अध्यक्षतेखाली जंतनाशक दिन मोहीमेच्या अनुषंगाने टास्क फोर्स कमिटीची सभा शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर,२०२४ रोजी दुपारी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.



अमरावती शहरामध्ये राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रम दि. ४ डिसेंबर, २०२४ रोजी राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींना जंतनाशकाची गोळी देण्यात येणार आहे. सर्व शाळा, महाविद्यालय व शाळाबाह्य १ ते १९ वर्षांच्या मुलांच्या पालकांनी आपल्या मुलांना राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रमाच्या आठवड्यामध्ये जंतनाशकाची गोळी द्यावी, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सचिन कलंत्रे यांनी केले आहे.१ ते १९ वर्षातील किमान २८ टक्के बालकांमध्ये आढळणारा आतड्यांचा कृमीदोष हा मातीतून प्रसारित होणाऱ्या जंतापासून होतो. याचे प्रमुख कारण म्हणजे वैयक्तिक व परिसर स्वच्छतेचा अभाव असते. कृमीदोष हा रक्तक्षय आणि कुपोषणाचे कारण आहेच. तसेच बालकांची शारिरीक व बौध्दिक वाढ खुंटण्याचे कारण ठरते. ही बाब लक्षात घेवून १ ते १९ वर्ष वयोगटातील सर्व शालेय वयोगटातील विद्यार्थी (शाळेतील व शाळाबाह्य) यांना शाळा व अंगणवाडी केंद्र स्तरावर जंतनाशक गोळी देवून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती व जीवनाचा दर्जा उंचावणे हा राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रमाचा उद्देश आहे.आरोग्य, शिक्षण, एकात्मिक बाल विकास विभाग या तीन मुख्य विभागांच्या समन्वयाने राष्ट्रीय जंतनाशक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. संस्था स्तरावर शाळा महाविद्यालय मधील १ ते १९ वर्षाच्या मुलांना शिक्षकांमार्फत राष्ट्रीय जंतनाशक दिन रोजी जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. तर समुदाय स्तरावर आशा, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये घरोघरी जावून शाळेत न जाणाऱ्या १ ते १९ वर्षाच्या मुलांना दि.४ डिसेंबर रोजी जंतनाशक गोळ्या देण्यात येणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत शहरातील मुलांना सदरचे औषध देण्यात येणार आहे. यामध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अंगणवाडी वयोगट (१ ते ६ वर्षे), शाळेतील (६ ते १८ वर्षे) व शाळाबाह्य मुलांचा समावेश आहे.महानगरपालिका क्षेत्रात अंगणवाडी, शाळा, शाळाबाह्य बालकांची नोंद असलेल्या १ लाख ८४ हजार ७१६ बालकांना जंतनाशक गोळी देण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. या मोहिमेत –श्रलशपवरेश्रश ४०० स ही गोळी चावून खाण्यास देण्यात येईल. त्यातही एक ते दोन वर्षे वय असलेल्या बालकास अर्धी गोळी (२०० मि. ग्रॅ.) पावडर करुन पाण्यात विरघळून, तर दोन ते तीन वर्षे वयाच्या बालकास एक गोळी ( ४०० मि. ग्रॅ.) पावडर करुन पाण्यात विरघळून देण्यात येईल. गोळी घेतांना बालकाने नाश्ता अथवा जेवण केलेले असणे आवश्यक आहे. लाभार्थी संख्येनुसार आवश्यक गोळ्यांचा साठा सर्व केंद्रस्तरावर पोहोचविण्यात आला आहे. आरोग्य कर्मचारी व आशा सेविका यांचे प्रशिक्षण झाले असून शिक्षकांनाही याबाबत सचेत करण्यात आले आहे,अशीही माहिती यावेळी देण्यात आली.०४ डिसेंबर,२०२४ ला सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी द्यावी व १००% काम करणे. तसेच राहिलेल्या मुलांना १० डिसेंबर,२०२४ ला जंतनाशक गोळी देवून सदर मोहीम राबविण्यात यावे असे मनपा आयुक्तांनी निर्देश दिले. या सभेत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.विशाल काळे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, बालरोगतज्ञ डॉ. मानसी मुरके, सीडीपीओ अतुल भडांगे, वैद्यकीय अधिकारी डॉ.संदिप पाटबागे, डॉ.स्वाती कोवे, शहरी आरोग्य केंद्राचे सर्व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य वर्धिनी केंद्राचे सर्व वैद्यकीय अधिकारी, डॉ. साजिद खान सर्वेलेन्स मेडीकल ऑफीसर उपस्थित होते.

# जिल्ह्यातील सात जागेवर महायुतीचा विजय

## हा कार्यकर्त्यांमुळेच ! कुणाचा वैयक्तिक नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महायुतीला विधानसभा निवडणुकीत अमरावतीच नव्हे तर राज्यभरात असाच विजय मिळाला आहे. त्यामुळे अमरावती जिल्ह्यात भाजप पाच आणि दोन मित्र पक्षाला जागा जिंकता आल्यात, हा दणदणीत विजय कुणाचा वैयक्तिक नव्हे तर कार्यकर्त्यांच्या श्रमाचे फलित आहे. असा सूर भाजप कार्यकत्यांमध्ये उमटू लागला आहे.



देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी तर राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा विश्वास आहे. मात्र अमरावती जिल्ह्यात भाजपच्या पाच आमदारांना विजय मिळवून दिल्याचा प्रसार माध्यमांत 'नरेटिव्ह' व्यवस्थितरीत्या तयार केला जात असल्याने भाजपा कार्यकर्ते नाराज होत आहेत. महायुतीला सात जागांवर विजय मिळविण्यात कार्यकर्त्यांच्या अपार परिश्रमांचे कृन्नित आहे, हे विसरता येणार नाही, अशी संतप्त भावना भाजपच्या सामान्य कार्यकत्यांची आहे. या संदर्भातील नाराजी पक्षश्रेष्ठींकडे पोहोचवयास प्रारंभ केला आहे.राज्यभर भाजपा व महायुतीला अभूतपूर्व, ऐतिहासिक यश मिळाले. त्याचाच लाभ अमरावती जिल्ह्याला देखील झाला. पण विजयानंतर बेधुंद होऊन सर्वत्र बेभान नाचणे आणि भाजपाने पराभूत केलेल्या दिग्गजांना जणू आपणच पराभूत केल्याचे श्रेयस्वताहून लाटणे सुरू केले आहे. बहुतांश भाजपा कार्यकर्ते आणि नेते यामुळे अस्वस्थ आहेत. उलट ठिकठिकाणी महायुतीत मिठाचा खडा टाकून वातावरण गढूळ केले होते. ते बिघडवलेले वातावरण जागेवर आणण्यासाठी भाजपा पदाधिकाऱ्यांना अहोरात्र परिश्रम करावे लागले. त्यामुळे मेळघाट, तिवसा, अचलपूर, धामणगाव, मोर्शी या पाच जागा भाजपला जिंकता आल्या. बच्चू कडू, यशोमती ठाकूर, वीरेंद्र जगताप यांच्या पराभवासाठी भाजपाने जीवाचे रान केले. काल परवा भाजपात आलेल्यांना बदले काढण्यासाठी नव्हे. बच्चू कडू. यशोमती ठाकूर यांच्या विरोधात भाजपा सातत्याने लढली. दोन दिवस केलेला विजयाचा उन्माद भाजपा मतदारांना आवडलेला नसल्याच्या प्रतिक्रिया समाजमाध्यमावर उमटत आहेत. भाजपा, संघ परिवार जमिनीवर परिश्रम करीत असताना बंडखोरांना पाठीशी घालत ठिकठिकाणी वातावरण खराब केले. भाजपावर संघटनात्मक अतिक्रमण करू इच्छिणाऱ्या भाजपाच्या बंडखोर उमेदवारांसाठी काहींनी स्वताचा प्रभाव वापरला, हे देखील विसरता येणार नाही. राज्यात कमी यश आणि जिल्ह्यात उल्लेखनीय यश मिळाले असते त्यांचा 'क्लेम वास्तव होता. जिल्ह्यात भाजपवर अतिक्रमण होत असताना मोठा विजय मिळवूनही भाजपा कार्यकर्ते अस्वस्थ आहेत, हे विशेष.

# वातावरणात गारठा वाढला थंडीमुळे विजेचा वापर घटला

## आला थंडीचा महिना : आता वीज बिल येणार कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

जिल्ह्यात हळूहळू थंडीचे आगमन होऊ लागले आहे. दिवसा कडकडीत ऊन पडत असले तरी सायंकाळनंतर वातावरणात गारठा जाणवू लागला आहे. गत काही दिवसांपासून धुके पडू लागले असून, पहाटेपासून सकाळपर्यंत थंडीचे प्रमाण चांगले असते. गारठा वाढल्यामुळे वातानुकूलित यंत्रांचा वापर कमी होऊ लागला आहे. त्यामुळे विजेचा वापर कमी झाल्यामुळे वीज बिल आता कमी येणार आहे.



यावर्षी दिवाळी सण तर थंडीविनाच गेला. दिवाळीतही काहींना उकाड्याचा त्रास जाणवत होता. त्यामुळे पंख्याशिवाय बसणे अशक्य झाले होते.परंतु गत दहा-बारा दिवसांपासून जिल्हावासीयांना गुलाबी थंडी जाणवू लागली आहे. दिवसा कडकडीत ऊन असले तरी त्याचा फारसा त्रास जाणवत नाही. सायंकाळपासून गारठा जाणवू लागतो. पहाटेच्या वेळी धुके पडत असल्यामुळे उशिरापर्यंत अंधार दाटलेला असतो. दवबिंदू पडत असल्यामुळे अंगण, घरांचे छत ओले होत आहे. नैसर्गिक गारव्यामुळे पंखे,कूलर यांचा वापर कमी झाला आहे. विजेच्या साहित्यांचा वापर कमी झाल्यामुळे त्याचा ग्राहकांना फायदा होणार आहे. सध्या कमाल ३० अंश सेल्सिअस तापमान असून, किमान तापमान १२ अंश सेल्सिअसपर्यंत येत आहे. उकाड्यामुळे शीतपेय, थंडगार पाणी तसेच थंडगार पदार्थांचे सेवन केले जाते. परंतु गारव्यामुळे या पदार्थांना विराम मिळत असल्याने रेफ्रीजरेटरचा वापर कमी झाला आहे. वाढत्या थंडीमुळे विजेवरील उपकरणांचा वापर कमी झाला आहे. निचांकी तापमानामुळे मागणीत आणखीन घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिवाळ्यात कमी वीज बिल येऊन दिलासा मिळणार आहे.

# सोयाबीनने दिला दगा; आता शेतकऱ्यांची कापसावरच भिस्त

## खासगी बाजारपेठेत मिळतोय तोकडा दर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

खरीप हंगामात सोयाबीनचे उत्पादन कमी झाले. त्या तुलनेत सोयाबीनचे दर वाढणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे सोयाबीन शेतकऱ्यांना परवडले नाही. आता शेतकऱ्यांचे पांढरे सोने समजले जाणाऱ्या कापसाला तोकडा दर मिळत असल्याने कापसाची दरवाढ व्हावी अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे

दरवर्षी प्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी सोयाबीनची मोठ्या प्रमाणात लागवड केली. मात्र अपेक्षेप्रमाणे सोयाबीनचे उत्पादन झाले नाही. उलट खासगी बाजारपेठेत सोयाबीनला चार हजार रुपयांपर्यंत अल्प दर मिळाल्याने सोयाबीनचे पीक शेतकऱ्यांना परवडले नाही.



सोयाबीन सोबतच शेतकरी खरीप हंगामात शेतकऱ्यांचे नगदी पीक म्हणून कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड करतात. मात्र दिवसेंदिवस शेतकऱ्यांचे पांढरे सोने समजले जाणाऱ्या कापसाला तोकडा दर मिळत असल्याने शेतकरी हतबल झाला आहे. कापसाच्या उत्पादनापेक्षा खर्च अधिकअसल्याने शेतकऱ्यांना सात हजार रुपये एवढ्या अल्प दरात कापूस विकणे परवडत नाही.कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांची आज वाईट अवस्था झाली आहे. एकीकडे निसर्गाची अवकृपा तर दुसरीकडे शासनाचे शेतकरी विरोधी धोरण यामुळे शेतीला दिवसेंदिवस अवकळा आली आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर अचलपूर, मोर्शी हे तालुके कापसाच्या उत्पादनात अग्रेसर मानले जातात. मात्र दिवसेंदिवस कापसाला तोकडा दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे पांढरे सोने आता नावालाच असल्याची भीती शेतकऱ्यांना आहे. खासगी बाजारपेठेत कापसाला सात हजार रुपये तोकडा दर मिळत असल्याने या कापसाच्या दरात शेतकऱ्यांनी कापसावर केलेला उत्पादन खर्च भरून निघत नाही. त्याचा मोठा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसतो. मात्र शासन शेतकऱ्यांच्या याज्वलंत प्रश्नांवर तोडगा काढायला तयार नाही. त्यामुळे शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी होत आहे. उत्पादनापेक्षा खर्च महाग झाल्याने शेतकऱ्यांना कमी किमतीत कापूस विकायला परवडत नाही. परंतु नाईलाजाने शेतकऱ्यांना सात हजार एवढ्या कवडीमोल भावात कापूस खाजगी व्यापाऱ्यांना विकावा लागत आहे. मात्र याकडे अजूनही शासनाने लक्ष देऊ नये हे एक कोडेच आहे.

**कापूस पिकांवर शेतकरी मोठ्या प्रमाणात खर्च**

करतात. मात्र खासगी बाजारपेठेत कापसाला तोकडा दर असल्याने कमी भावात कापूस विकणे शेतकऱ्यांना परवडत नाही. कापूस वेचणीचे दर वाढल्याने कापसाची दरवाढ होणे अपेक्षित आहे.

**–प्रकाश साबळे युवा शेतकरी**

# पोस्टातून बचत गटांची उत्पादने डायरेक्ट घरी : 'उमेद' अंतर्गत महिलांचे सक्षमीकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

बचत गटांच्या माध्यमातून महिला पारंपरिक उत्पादनांची निर्मिती करतात. या उत्पादनांना राज्यासह देशात बाजारपेठ मिळण्यासाठी बचत गट प्रयत्न करत असतात. याच प्रयत्नांना बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र पोस्ट विभाग आणि उमेद अभियान यांनी एकत्र येत पोस्टामार्फत बचत गटांची उत्पादने घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. याअंतर्गत जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात बचत गटातील महिलांना पोस्टाची मदत मिळणार आहे.

राज्य सरकारच्या उमेद अभियानांतर्गत ग्रामीण भागातील महिलांना उपजीविकेचे साधन मिळत असते. उमेद अभियानामार्फत ग्रामीण आणि महिला उद्योजकांना तयार उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मदत व्हावी यासाठी पोस्ट विभागाने सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे.

या करारांतर्गत, पोस्ट विभाग उमेदशी संलग्न महिला बचत गटांना कॅश ऑन-डिलिव्हरी सुविधांसह पार्सल सेवा देणार आहे. यामुळे महिलांना त्यांची उत्पादने राज्यभर पोहोचवता येतील, तसेच आर्थिक सक्षमीकरण, स्वयंपूर्णतेला चालना मिळेल, आधी माहिती डाक अधीक्षक यांनी दिली

**कराराची वैशिष्ट्ये**

कॅश ऑन डिलिव्हरी सुविधा :महिला उद्योजकांना वेळेवर मोबदला मिळण्यासाठी ही सेवा,

**मोफत पिक-अप सेवा:** राज्यभरात एकाच ठिकाणी मासिक व्यवसाय १० हजारांपेक्षा जास्त असेल तर बचत गट परिसरातून मोफत पिक-अप सेवा.

**डाकघर निर्यात केंद्र**

परदेशात वितरित केल्या जाणाऱ्या पार्सलसाठी एक स्टॉप शॉप, पॅकेजिंग, बुकिंग, कस्टम क्लिअरन्स आदी सेवा एकाच छताखाली राहणार आहे.

# समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा महिनाभरात खुला एमएसआरडीसीकडून कामांचा धडाका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

समृद्धी महामार्गाचा इगतपुरी ते ठाण्यातील आमने हा शेवटचा टप्पा येत्या महिनाभरात वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. या शेवटच्या टप्प्यातील मार्गाची आता अंतिम टप्प्यातील कामे सुरू असून ती पूर्ण करून हा ७६ किमी लांबीचा मार्ग सुरू होणार आहे. त्यातून समृद्धी महामार्गावरून मुंबई ते नागपूर असा सलग प्रवास करणे शक्य होणार आहे.

समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर नागपूर येथून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर पोहोचणे शक्य होणार आहे. तसेच या महामार्गाचा संपूर्ण ७०१ किमी लांबीचा मार्ग वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी इगतपुरी ते आमने या शेवटच्या टप्प्यातील मार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाणार होता. मात्र, या टप्प्यात अभियांत्रिकीच्या दृष्टीने किचकट असलेल्या खर्डी येथील एका जवळपास १.५ किमी लांबीच्या पुलाचे काम बाकी होते. आता या पुलाची कामे पूर्ण झाली असून केवळ अंतिम टप्प्यातील कामे सुरू आहेत. तसेच यापूर्वी या पुलाच्या ठिकाणी एका बाजूचा मार्ग सुरू करण्याचा एमएसआरडीसीचा प्रयत्न होता. मात्र, समृद्धी महामार्गाचा शेवट होतो त्या आमने येथून पुढे वडपे येथे जाण्यासाठी उभारण्यात येणार्या रस्त्याचे काम अपूर्ण होते.

या भागात असलेल्या गोडाऊनची जागा रस्त्याच्या कामासाठी आवश्यक होती. ही जागा मिळण्यात येणार्या अडचणी, तसेच सततच्या पावसामुळेही कामे लांबली होती. मात्र, आता पावसाळा संपल्यानंतर एमएसआरडीसीकडून ही कामे जलदगतीने पूर्ण केली जात आहेत. या चार किमी लांबीच्या रस्त्यांची कामे जवळपास पूर्णत्वाच्या दिशेने निघाली असून केवळ अंतिम टप्प्यातील काही कामे बाकी असून येत्या महिनाभरात हा मार्ग सुरू करणे शक्य असल्याचे अधिकार्यांनी नमूद केले. त्यामुळे नवीन सरकारचा शपथविधी पार पडल्यानंतर पुढील महिनाभरात या शेवटच्या टप्प्यातील मार्गाचे लोकार्पण केले जाण्याची शक्यता अधिकार्यांकडून वर्तविली जात आहे.

# हिवाळा लागताच वाढली बाजरीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

थंडीच्या दिवसांत बाजरीची 'भाकरी आरोग्याला चांगली असते, असे मानले जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात बाजरीला मागणी असते. यंदा हिवाळा सुरू होताच, बाजरीला मागणी वाढली आहे. त्यामुळे बाजारात प्रतिकिलो वाजरी ३० ते ३२ रुपयांपर्यंत पोहोचली आहे.



घाऊक बाजारात गतवर्षीचे दरस्थिर असले तरी किरकोळ बाजारात बाजरीचे दर वाढले आहेत. थंडीच्या दिवसात बाजरीची भाकर आरोग्याला चांगली असते, असे मानले जाते. त्यामुळे हिवाळ्यात बाजरीला विशेष मागणी असते. यंदा हिवाळा सुरू होताच बाजरीचे दर वाढले. यंदा प्रतिकिलो बाजरी ३३ ते ३५ रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

घाऊक बाजारात ३२ रुपये मिळतअसली तरी किरकोळ बाजारात बाजरीचे दर वाढले आहेत. जिल्ह्यात बाजरीचे क्षेत्र उपलब्ध नाही. सोयाबीनचे उत्पादन सर्वाधिक प्रमाणात जिल्ह्यात होते. शहरासह जिल्ह्यामध्ये ज्वारी, बाजरी यांची आवक होते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा कल हा नगदी पिकांकडे असल्याने दरवर्षी बाजरीचे क्षेत्र कमी होत आहे.


# प्रचारातून स्वत:चेही केले ब्रँडिंग स्थानिक नेत्यांनी घेतली खबरदारी

## विधानसभा निकालाने मनपा, जिल्हा परिषदेत नवीन समीकरणांचे संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

अमरावती जिल्ह्यातील आठ पैकी महायुतीच्या सात विधानसभा मतदारसंघांवर कब्जा मिळविला, तर महाविकास आघाडीतील काँग्रेसलाजिल्ह्यात खासदार असतांना सुद्धाएक ही जागा निवडून आणता आली नाही. मागील निवडणुकीच्या तुलनेत काँग्रेसने आमदारकीच्या दोन जागा गमावून पिछाडीवर गेली. येत्या काही महिन्यांत जिल्हा परिषद व अमरावती महानगरपालिकेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे विधानसभेच्या धक्कादायक निकालातून सत्तेची नवीन समीकरणे तयार होण्याचे संकेत आहेत.

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट, अचलपूर, तिवसा, मोर्शी, धामणगाव रेल्वे, बडनेरा आणि अमरावती याविधानसभा निवडणुकीत महायुतीतील उमेदवारांचा दणदणीत विजय झाला आहे.भाजप आणि महाविकास आघाडीतील काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांनी आपापल्या क्षेत्रात प्रचार करण्यासाठी मैदानात उतरले होते.मात्र त्यांना यश आले नाही.या स्थानिक नेत्यांना येत्या काही महिन्यांत होणाऱ्या महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांची निवडणूक महत्त्वाची आहे. त्यामुळे आपल्या पक्षातील उमेदवाराचा प्रचार करताना मनपातील प्रभाग, जिल्हा परिषदेचा गट व पंचायत समितीच्या गणातील उद्याची संभाव्य समीकरणे डोळ्यांसमोरच ठेवूनच हालचाली केल्या. जिल्हा परिषदेत तब्बल दोन टर्म काँग्रेसची एकहाती सत्ता होती. अमरावती महानगरपालिकेवर भाजपचा एकछत्री अंमल होता.



विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील सात जागांवरदणदणीत विजय मिळवून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. प्रत्येक निवडणुकीतील समीकरणे सारखी नसतात, हे खरे असले तरी भाजपची सरशी मनपा व जिल्हा परिषदेत नवीन समीकरणांची नांदी ठरण्याची शक्यता वर्तुळात वर्तविली जात आहे.या नवीन समीकरणात आता भाजप,युवा स्वाभिमान आणी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हे पक्ष एकत्र येण्याचे संकेत आहेत.




# भारतीय संविधान दिन......



आज मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २४ रोजी संविधान दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले असुन या प्रसंगी,अमरावती शहर जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष बबलुभाऊ शेखावत, माजी महापौर विलसभाऊ इंगोले, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर , माजी महापौर सौ.वंदना कंगाले,भैया पवार, अभिनंदन पेंढारी राजाभाऊ चौधरी,सलीम मिरावाले , विजय बर्वे,प्रा.अनिल देशमुख,सौरभ तायडे,भैया साहेब निचड,अमर देशकर,समीर जवंजाळ,यांच्या सह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# शहर जिल्हा काँग्रेस कमिटी कार्यकारिणीच्या बैठकीत पराभवाने हताश न होता नवीन जोमाने पुढील वाटचाल करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ निवडणुक नुकतीच संपन्न झाली,यामध्ये काँग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील जनतेकरिता पंचसूत्री जाहीरनाम्यात मोठ्या व सुलभ योजनेचे नियोजन केले होते.मात्र मतदारांनी त्याकडे साफ दुर्लक्ष करीत जिल्ह्यातून काँग्रेस हद्दपार केली. झालेला पराभव पाहता आता समोर येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत पराभवाने हताश न होता नवीन जोमाने पुढील वाटचाल करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन आजच्या बैठकीत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांना केले.

**अमरावती विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले**

शहरातील जनतेने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला का समर्थन दिले नाही आपण कुठे कमी पडली,आपि काय चूक झाली यावर विचार मंथन करण्यात आले तर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष पुढे जनतेकरिता मोठ्या प्रमाणावर एकजुटीने काम करेल असे ठाम मत काँग्रेसच्या नेत्यांकडून आजच्या बैठकीमध्ये मांडण्यात आले.दरम्यान प्रामुख्याने मंचावर अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलु शेखावत,माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख,माजी महापौर विलास इंगोले,प्रदेश प्रवक्ते दिलीप येडतकर,माजी महापौर मिलिंद चिमोटे,प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार,प्रदेश महासचिव किशोर बोरकर,माजी महापौर अशोक डोंगरे,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे उपस्थित होते.



अमरावती विधानसभेत काँग्रेस पक्षाच्या पराभवा नंतर काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते अधिक मोठ्या जोमाने जनसेवेकरीता सज्ज राहतील असे एकमताने उपस्थितांनी बैठकीत ग्वाही दिली.भविष्यात येणाऱ्या निवडणुकीकरिता एकोप्याने मोठ्या ऊर्जेने काँग्रेस पक्षाचा एकूण एक कार्यकर्ता मेहनत करेल व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला मोठा विजय मिळून देईल अशी शपथ घेतली तसेच भारतीय संविधान दिवसानिमित्त विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून २६/११ च्या भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांना आदरांजली देण्यात आली.याप्रसंगी प्रामुख्याने विनोद मोदी,प्रदीप हिवसे,मुकेश गिरी,सलीम बेग,वंदना कंगाले, शोभा शिंदे,अस्मा परवीन सुजाता झाडे,योगिता गिरासे शिरीन खान,वंदना थोरात अनिला काजी,लक्ष्मी अहिरे,शिल्पा राऊत,अपर्णा मकेश्वर,कांचन खोडके,नजीर खान बी.के,रविंद्र इंगोले,नौशाद अली,धीरज हिवसे,अब्दुल रऊफ,रवींद्र शिंदे,अरुण जयस्वाल,सुनील जावरे,विजय वानखडे,गोपाल धर्मळे,गजानन जाधव,विजय खंडारे,अरुण बनारसे,पंकज मेश्राम,सादिक शाह,समीर जवंजाळ,अतुल काळबेंडे,निलेश गुहे,वैभव देशमुख,संकेत कुलट,संकेत साहू,बी.टी.अंभोरे,प्रदीप अरबट,विजय बर्वे,अनिल देशमुख,अनिल तायडे,नाना बारबुद्धे,अमर भेर्डे,प्रकाश वानखडे, विकास डोंगरे,दीपक हुंडीकर,सुरेश धावडे,सुजल झंळे,यश तायडे,सतीश काळे,लखन यादव,सचिन निकम,विजय आठवले,संदीप मानकर यांच्या सह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शहर व ग्रामीण भागात ऑटो,दुचाकी सह चार चाकी वाहनांमध्ये एलईडी लाईटची क्रेझ

## नियमबाह्य एलइडी लाइट लावणाऱ्या वाहनांवर कारवाईची मागणी

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ अमरावती**

ऑटो,चारचाकी व दुचाकी वाहनांच्या सजावटीसह आता चारचाकी व दुचाकी वाहनांमध्ये लखख प्रकाश पाडणार्या एलइडी लाइटची क्रेझ मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. काही वाहनचालक हौस म्हणून या लाइटचा वापर करत असले, तरी परिवहन विभागाच्या कोणत्याच नियमात हे लाइट बसत नसून, या लाइटमुळे अनेक अपघात घडले असून, पुढेही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.



नियमबाह्य एलइडी लाइट लावणार्या वाहनांवर संबंधित विभागाने कारवाई करावी, अन्यथा संबंधित विभागाचे दुर्लक्ष अनेकांच्या जीवावर बेतेल, अशी मागणी आता सुज्ञ नागरिकांकडून होत आहे. अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण भागातही काही हौशी - गौशी दुचाकी व चारचाकी वाहनधारकएलइडी लाइट नियमबाह्यरीत्या लावत आहेत. धारणी तालुक्यात घाटाचे व वळणाचे अनेक रस्ते आहेत.त्यामुळे या एलइडी लाइटचा प्रकाश थेट समोरून येणार्या वाहनचालकाच्या डोळ्यावर पडून अपघाताच्या अनेक घटना घडत आहेत. त्यामुळे हे लाइट वाहनधारकांसाठी जीवघेणे ठरत आहेत. विशेष म्हणजे, परिवहन विभागाच्या परवानगीशिवाय वाहनात कुठलाही बदल करता येत नाही. मात्र, नियम डावलून एलइडी लाइट बिनधास्त वापरले जात आहेत.अनेक चारचाकी वाहनांवर हेडलाइटच्या शेजारी हेएलइडी लाइट बसविण्यात येत असल्याने मोटारसायकलने रात्रीचा प्रवास धोकादायक ठरत आहे. एलइडी लाइट लावणार्या वाहनांवर कारवाई होत नसल्याने अनेकांना हे लाइट लावणे नियमात बसते, असे वाटत असून, दिवसेंदिवस एलइडी लाइट लावणार्यांची संख्या वाढत चालली आहे.वाहनात लावले जाणारे हेडलाइट हे वाहन निर्मिती करणार्या कंपन्यांना परिवहन विभागाच्या नियमानुसार तयार करावे लागतात. त्यांच्या विविध चाचण्यांमध्ये हे हेडलाइट खरे उतरल्यावरच त्यांना संबंधित कंपनीला वापरण्यास परिवहन विभाग नाहरकत प्रमाणपत्र देतो.मात्र, बाजारात मिळणारे एलइडी लाइट हे कोणत्याच नियमात बसत नाहीत. अशा प्रकारचे एलइडी लाइट १०० रुपयांपासून ते १ हजार रुपयांपेक्षा अधिक किमतीने बाजारात व ऑनलाइन सहजरीत्या मिळतात हे विशेष.

# आरक्षण फॅक्टर 'विधानसभे'त फेल : मराठवाड्यात महायुतीचे तब्बल २६ मराठा आमदार विजयी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६हिंगोली**

मराठा आरक्षणाचे गढ ठरलेल्या मराठवाड्यातच जनतेच्या दरबारी मराठा आरक्षण फॅक्टर फेल झाल्याचे समोर आले आहे. विभागात महायुतीचे सर्वाधिक २६ मराठा आमदार विजयी झालेत. तर महाविकास आघाडीचे केवळ ३ मराठा आमदार निवडून आलेत. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या आरक्षण मागणीला त्यांच्या भागातच मतदारांनी सपेशल नाकारत आपला कौल महायुती आणि त्यातही भाजपच्या बाजूने दिल्याचे दिसते.

मराठवाड्यात एकूण ४६ मतदार संघ आहेत. त्यात सर्वाधिक २९ मराठा आमदार विजयी झालेत. तर ओबीसी ९, एससी ५, अल्पसंख्याक २, तर एका जागेवर आदिवासी समाजाचा उमेदवार विजयी झालाय. मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्या मान्य झाल्या म्हणत आंदोलन थांबवणाऱ्या आणि त्यानंतर पुन्हा सरकारविरोधात वारंवार आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी मुस्लीम आणि दलित समाजासोबत विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्याची घोषणा केली होती.






# जिल्ह्यात संविधान दिवस उत्साहात साजरा : शाळा, महाविद्यालय व शासकीय कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या २४ नोव्हेंबर २००८ च्या शासन निर्णयानुसार भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी याकरिता राज्यात दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून उत्साहात साजरा करण्यात येतो.



मंगळवारी (दि.२६) जिल्ह्यातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपरिषद, ग्रामपंचायती तसेच सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळी महाविद्यालयामार्फत संविधान यात्रा काढण्यात आली व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्त्वाची कलमे ठळकपणे दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्सलावण्यात आले होते.शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध, भित्तीपत्रके, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.